नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १३८ * | * अकोला * | शुक्रवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :**
काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांचे पती व्यावसायिक रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) गुरुवारी आरोपपत्र दाखल केले. हा खटला ब्रिटिश शस्त्रास्त्र व्यापारी संजय भंडारी यांच्याशी संशयास्पद व्यवहारांशी संबंधित आहे. दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले.
या प्रकरणात जुलैमध्ये पीएमएलए अंतर्गत वड्रा यांचे जबाब नोंदवण्यात आले होते. ईडीचा दावा आहे की, वाड्रा आणि भंडारी यांच्यातील आर्थिक व्यवहारांशी संबंध उघडकीस आले आहेत, ज्यामध्ये परदेशी मालमत्ता आणि निधी हस्तांतरणाची चौकशी समाविष्ट आहे.

अग्राग्रलेख
## खरीखरी..

# नितीश कुमार है ना...

आज बिहारच्या जुन्या मुख्यमंत्र्यांनी नव्या मंत्रिमंडळाला उद्घोषित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि देशातील तमाम एनडीएचे मुख्यमंत्री या शपथ ग्रहण समारंभासाठी विजयी मुद्रेने अगदी ठसक्यात हजर होते. निवडणूक कशी लढवावी, याचे कित्ते इतर पक्षांनी भाजपकडून घेतलेच पाहिजेत. कुठे कशी कळ फिरवावी याचे गणित भारतीय जनता पक्षाने बरोबर आत्मसात करून घेतलेले आहे. कोणत्या वेळेला कोणती गोळी मारावी, कुठे कोणाला गोळा करावे कोणाची मांडवणी करावी आणि कोणासोबत मांडवली करावी, यामध्ये आता भारतीय जनता पक्ष अगदी सक्षम झालेला आहे. केवळ विरोधासाठी विरोध करून निवडणुका जिंकता येत नाही हेही या सर्व गोष्टींमधून दिसून येत आहे. या सर्व गदारोळात भारतीय जनता पक्षाने बिहारमध्ये क्रमांक एकचे स्थान पटकावलेले आहे. तरीही गंमत अशी आहे की या क्रमांक एकच्या स्थानावर असूनही भाजप जवळ बिहारमध्ये पहिल्या क्रमांकावर बसणारा आमदारच नाही हे दिसून आलेले आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, छत्तीसगड किंवा आणखी इतर राज्यांमध्ये जे 'हिज मास्टर्स व्हॉइस' प्रकारचे मुख्यमंत्री बसवण्यात आले तसा प्रयोग बिहारमध्ये करणे शक्य नव्हते. नितीश कुमार आजारी आहेत अशा वदंता अनेक दिवसांपासून फिरत होत्या. यावेळी सर्वाधिक जागा जिंकून भाजपचाच मुख्यमंत्री होणार अशा बाजार गप्पा आणि बतावण्या काही महिन्यापासून सगळ्याच ठिकाणी करण्यात येत होत्या. नितीश कुमार जिथे जिथे जात तिथे त्यांचे शेपूट धरून सम्राट चौधरी फिरत होते. निवडणूक निकालानंतर कोणाला मुख्यमंत्री करावे याचा बराच खल झाला, पण त्या चिखलातून बाहेर पडण्यासाठी नितीश कुमार एके नितीश कुमार हाच महामंत्र होता, हे नंतर सगळ्यांनाच दिसून आले. खुद्द नितीश कुमार बिनधास्त होते त्यांनी मस्तपैकी आपले विचार व्यक्त करून या दलदलीत पाय ठेवण्याचा आपला इरादाच नाही हे स्पष्ट केले होते. पण शेवटी नितीश कुमार शिवाय पर्याय नाही. हे दिसून आल्यावर जिंकलेल्या आमदारांच्या बैठकीत नितीश कुमार यांच्या नावाचा आधी उल्लेख झाला आणि त्यानंतर जयघोष झाला. दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदावर बसताना त्यांनी काही अटी टाकल्याचे वृत्त आहे. विशेष म्हणजे त्या सर्व अटी मान्य करण्यात आल्या आहेत. हे सुद्धा वृत्त आहे, त्याचबरोबर खातेवाटप सुद्धा त्यांच्या मर्जीनेच होईल इथपर्यंत परिस्थिती निर्माण झालेली आहे असे दिसते. मग आता खरा प्रश्न निर्माण होतो ते म्हणजे विधानसभा अध्यक्षांच्या निवडीचा. विशेष म्हणजे या पदावर ही नितीशजी सांगतील त्याचीच निवड होणार आहे, हे पक्के आहे. नितीश कुमार यांच्याकडे एवढे बळ कुठून आले असा बऱ्याच लोकांना प्रश्न पडला असेल. त्याचे एकमात्र उत्तर असे आहे की, त्यांची बिन डागाची कारकीर्द तसेच त्यांच्या निष्ठावंत असलेल्या १७ ते १८ टक्के मतदारांची नितीश कुमार यांच्या प्रति असलेली निष्ठा. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की निस्वार्थपणे सेवाभावाचे कार्य केले तर तुम्हाला कोणीही डावलू शकत नाही. कोळशाच्या वखारीत राहून एकही काळा डाग नसलेल्या नितीश कुमार यांना मुख्यमंत्री पदाचा हा दहावा शपथविधी मंगलदायी ठरेल याबद्दल आमच्या मनात शंका नाही. त्यासाठी नितीश कुमार यांचे अभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# नितीश कुमार पुन्हा सीएम

### २६ मंत्र्यांनीही घेतली शपथ : भाजपचे १४, जेडीयूचे ८, लोजपाचे २ मंत्री

■ **वृत्तसंस्था, पाटणा, दि. २० :**
नितीश कुमार यांनी १० व्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. गांधी मैदानावर झालेल्या भव्य समारंभात पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह अनेक ज्येष्ठ भाजप नेते उपस्थित होते. सम्राट चौधरी आणि विजय कुमार सिन्हा यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. एकूण २६ आमदारांना मंत्रीपदाची शपथ देण्यात आली.
हरियाणा, आसाम, गुजरात, मेघालय, उत्तर प्रदेश, नागालँड, ओडिशा, दिल्ली आणि राजस्थानचे मुख्यमंत्री देखील उपस्थित होते. चिराग पासवान यांनी व्यासपीठावर मांझी आणि जेपी नड्डा यांना चरणस्पर्श करून त्यांचे आशीर्वाद घेतले.
यावेळी नितीश यांच्या मंत्रिमंडळात नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. रामकृपाल यादव आणि श्रेयसी सिंह यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. चिराग यांच्या पक्षातील दोन आमदारांना मंत्री बनवण्यात आले आहे,




## एकनाथ शिंदेनी मांडली शहांकडे कैफियत



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेत आपले गाऱ्हाणे त्यांच्यासमोर मांडल्याची माहिती आहे. शिंदे आणि अमित शाह यांच्यामध्ये जवळपास ५० मिनिट चर्चा झाली. शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे राज्यातील राजकीय घडामोडी कथन केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.
विधानसभा निवडणुकीतल्या विजयानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये युतीसाठी अत्यंत पोषक वातावरण आहे, मात्र काही नेते ते वातावरण दुषित करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे केला. विरोधकांना यामुळे आयतं कोलीत मिळते, मीडीयात नाहक उलटसुलट बातम्या येत आहेत, त्यामुळे जनमानसात संभ्रम निर्माण होत असून, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे, युतीच्या विजयी घोडदौडीत त्यामुळे विनाकारण अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.
काही नेते वैयक्तिक स्वाथापोटी काम करत आहेत, त्यांच्याकडून अशा पध्दतीने काम यापुढे होणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे. तसेच युतीतल्या नेत्यांनी एकमेकांवर टीका टाळली पाहिजे. भाष्य करताना प्रत्येकाने संयमाची आणि सामंजस्याची भूमिका घेणे अपेक्षित आहे, असं यावेळी एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांना सांगितल्याची माहिती समोर येत आहे.
दरम्यान सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची तक्रार शिंदे यांनी शाह यांच्याकडे केल्याची तसेच चव्हाणांकडून महायुतीमध्ये मिठाचा खडा टाकला जात असल्याचा आरोप शिंदेंकडून करण्यात आल्याची माहिती आहे.
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपाकडून पळविण्यावरून महायुतीत विशेषतः शिंदेसेना आणि भाजपात वादंग निर्माण झाल्याचे दिसत आहे.

## खोल दरीत कोसळली थार
# ६ तरूण ठार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
पुण्याहून पर्यटनासाठी कोकणात निघालेल्या तरुणांच्या एका ग्रुपवर काळाने घाला घातल्याची अत्यंत दुर्दैवी घटना रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाटात उघडकीस आली आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्याने 'थार' कार ५०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला.
मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील काही तरुण मंगळवारी रात्री कोकणात फिरायला निघाले होते. मात्र, रात्रीच्या सुमारास ताम्हिणी घाटातील अवघड वळणावर हा अपघात झाला. मंगळवारपासून हे तरुण संपर्कात नसल्याने त्यांच्या नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. मोबाईल लोकेशन तपासले असता, ते रायगड आणि पुणे जिल्ह्याला जोडणाऱ्या ताम्हिणी घाटात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर आज सकाळी स्थानिक रेस्क्यू टीम आणि पोलिसांच्या मदतीने शोध घेतला असता, ५०० फूट खोल दरीत चक्काचूर झालेली थार आढळून आली.
ज्या गाडीचा अपघात झाला ती 'थार' कार अवघ्या २० दिवसांपूर्वीच खरेदी करण्यात आली होती. नवीन गाडीतून फिरण्यासाठी निघालेल्या या तरुणांचा प्रवास अखेरचा ठरला. कारमध्ये एकूण ६ पुरुष प्रवासी होते. चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने कार थेट दरीत कोसळल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. अपघातात प्रथम चव्हाण, पुनित शेट्टी, साहील बोटे, महादेव कोळी, ओंकार कोळी, शिवा माने या तरुणांचा मृत्यू झाला असून, हे सर्व पुण्यातील रहिवासी होते.

## ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकने भारताला हरवले?

अमेरिकेचा अहवाल

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. २० :**
मे २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या चार दिवसांच्या युद्धात (ऑपरेशन सिंदूर) पाकिस्तानला मोठे लष्करी यश मिळाल्याचा दावा एका अमेरिकन अहवालात करण्यात आला आहे.
या अहवालात पहलगाम हल्ल्याला दहशतवादी हल्ला नसून बंडखोरीचा हल्ला असे संबोधले आहे. हा ८०० पानांचा अहवाल अमेरिका-चीन आर्थिक आणि सुरक्षा पुनरावलोकन आयोगाने (यूएससीसी) प्रसिद्ध केला आहे.
काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी या अहवालाला विरोध दर्शवला आहे आणि त्याबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी विचारले की, पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्रालय आपला आक्षेप आणि निषेध नोंदवतील का? आपल्या राजनैतिकतेला आणखी एक मोठा धक्का बसला आहे.
अहवालात असे म्हटले आहे की पाकिस्तानने राफेल विमानांसह किमान सहा भारतीय लढाऊ विमाने पाडल्याचा दावा केला आहे, ज्यामुळे राफेलची प्रतिमा खराब झाली आहे. अहवालात असेही म्हटले आहे की प्रत्यक्षात फक्त तीन भारतीय विमाने पाडण्यात आली आहेत.
यूएससीसीचे म्हणणे आहे की चीनने भारत-पाकिस्तान युद्धाचा वापर थेट युद्धात आपल्या आधुनिक शस्त्रांची चाचणी घेण्यासाठी आणि ती जगासमोर प्रदर्शित करण्यासाठी केला. या लढाईनंतर, जगभरातील चिनी दूतावासांनी त्यांच्या शस्त्रांचे कौतुक केले आणि म्हटले की पाकिस्तानने त्यांचा वापर भारतीय लढाऊ विमाने पाडण्यासाठी केला होता. दरम्यान, या अहवालानंतर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## लाल किल्ला स्फोट प्रकरणात आणखी चार आरोपींना अटक

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :**
१० नोव्हेंबर रोजी दिल्लीतील लाल किल्ल्याबाहेर झालेल्या स्फोटात सहभागी असलेल्या आणखी चार प्रमुख आरोपींना राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) अटक केली आहे. यामुळे या प्रकरणात अटक झालेल्यांची एकूण संख्या सहा झाली आहे. पटियाला हाऊस कोर्टाच्या जिल्हा सत्र न्यायाधीशांच्या प्रॉडक्शन ऑर्डरवर एनआयएने जम्मू आणि काश्मीरमधून चार आरोपींना ताब्यात घेतले.
एनआयएने आरोपींची ओळख पटवली आहे ते पुलवामा (जम्मू आणि काश्मीर) येथील रहिवासी डॉ. मुजम्मिल शकील गनई, अनंतनाग (जम्मू आणि काश्मीर) येथील रहिवासी डॉ. अदील अहमद राथेर, लखनऊ (उत्तर प्रदेश) येथील रहिवासी डॉ. शाहीन सईद आणि शोपियां (जम्मू आणि काश्मीर) येथील रहिवासी मुफ्ती इरफान अहमद वागे अशी त्यांची नावे आहेत.

## अंत्यविधीदरम्यान ५ जण होरपळले

एकाचा मृत्यू एक गंभीर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :**
अंत्यविधी दरम्यान चितेवर ओतलेल्या डीझेलमध्ये आगीचा भडका झाल्याने ५ नातेवाईक गंभीररित्या होरपळल्या गेले. यात एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर एकाची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना वाठोडा दहनघाटावर घडली.
विनोद पुंडलिक मुनघाटे (६६) रा. कर्वेनगर, वर्धा रोड असे मृताचे तर, ज्ञानेश्वर गायकवाड, सोपान गायकवाड, अशोक मुनघाटे, विठ्ठल पसारकर अशी जखमींची नावे आहेत.
गत १५ नोव्हेंबर रोजी साकेतची मावशी सुशीला हरीभाऊ मुनघाटे (८३) रा. वाठोडा यांचे निधन झाले. सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास त्यांचा मृतदेह अंत्यविधीसाठी वाठोडा दहनघाटावर नेण्यात आला. मोठ्यासंख्येत नातेवाईक अंत्यविधीला उपस्थित होते.
मृतदेहाला अग्नी देण्यासाठी चितेवर डीझलेही ओतण्यात आले होते. विनोदसह इतर जवळचे नातेवाईक चिते शेजारीच उभे राहून अंत्यविधीची प्रक्रिया करीत होते. अग्नी देताना डीझेलमुळे प्रचंड लोळ उठले.
आसपास उभ्या नातेवाईकांच्या कपड्यांना आग लागली आणि वरील पाचही जण होरपळले. सर्वांना उपचारार्थ तात्काळ मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोपान, अशोक आणि विठ्ठल यांना प्राथमिक उपचारानंतर सुटी देण्यात आली. मात्र विनोद आणि ज्ञानेश्वर गंभीररित्या भाजले होते.
दोघांचीही प्रकृती चिंताजनक होती. विनोद यांना खासगी रुग्णालयात स्थलांतरित करण्यात आले, मात्र बुधवारी उपचारादरम्यान विनोद यांचा मृत्यू झाला. ज्ञानेश्वर यांच्यावर मेडिकल रुग्णालयातच उपचार सुरू आहेत. वैद्यकीय अहवालाच्या आधारावर वाठोडा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## लुधियानामध्ये दहशतवाद्यांचा एन्काउंटर

■ **वृत्तसंस्था, लुधियाना, दि. २० :**
पंजाबमधील लुधियाना येथे पोलिसांनी दहशतवाद्यांचा एन्काउंटर केला. दिल्ली-अमृतसर राष्ट्रीय महामार्गावरील लाडोवाल टोल प्लाझाजवळ ही चकमक झाली.
पोलिसांनी एक दिवस आधी हरियाणा आणि बिहारमधील दहशतवाद्यांना हातबॉम्बसह अटक केली होती. चौकशीतून त्यांचा ठावठिकाणा कळला. पोलिसांनी त्यांना घेरले तेव्हा त्यांनी गोळीबार केला. पोलिसांनी प्रत्युत्तरात गोळीबार केला. दोन दहशतवादी जखमी झाले. त्यातील एकाचा मृत्यू झाला. घटनास्थळावरून पोलिसांनी पिस्तूल, काडतुसे व हातबॉम्ब जप्त केले आहेत.

## काय ती झाडी फेम शहाजीबापूंचा
# भाजपावर गंभीर आरोप



■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. २० :**
सांगोला नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना आणि भाजपमध्ये सुरू असलेल्या तणावाला आणखी तीव्र वळण मिळाले आहे. शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी भावनिक होऊन भाजपवर गंभीर आरोप केले.
लोकसभा निवडणुकीदरम्यान आजारी असूनही भाजप उमेदवाराला १५ हजार मतांचे आघाडी मिळवून देण्यासाठी जीव ओतून काम केले, मात्र आता भाजपने सांगोल्यात आपल्याला पूर्णतः एकटे पाडले, अशी त्यांची खदखद आहे.
शहाजीबापूंनी आपली नाराजी आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे व्यक्त करायला सुरुवात केली आहे. सांगोल्यात जे घडत आहे ते मुख्यमंत्री पाहत नाहीत का? असा थेट प्रश्न त्यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला.

## ज्युनियर डोनाल्ड ट्रम्प प्रेयसीसोबत आग्र्यात

■ **वृत्तसंस्था, आग्रा, दि. २० :**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे पुत्र डोनाल्ड ट्रम्प ज्युनियर यांनी गुरुवारी पहिल्यांदाच ताजमहालला भेट दिली. त्यांनी त्यांच्या प्रेयसीसोबत डायना बेंचवर बसून फोटो काढला.
त्यांनी मुघल सम्राट शाहजहां आणि त्यांची पत्नी मुमताज यांच्या थडग्यालाही भेट दिली. ते ताजमहाल संकुलात सुमारे ४५ मिनिटे राहिले. त्यांची प्रेयसी लाल रंगाच्या वेस्टर्न ड्रेसमध्ये दिसली आणि ट्रम्प ज्युनियर पांढऱ्या रंगाच्या पोशाखात दिसला.
ट्रम्प ज्युनियर दुपारी १:३० वाजता एका खास विमानाने आग्राच्या खेरिया विमानतळावर पोहोचले. विमानतळावरून ते हॉटिल अमर विलास ओबेरॉय येथे गेले. त्यांच्यासाठी येथे कोहिनूर सूट बुक करण्यात आला होता.



करिअरच्या सुवर्णसंधी!
महासागर
विदर्भाचे प्रसिद्ध मराठी दैनिक, गरजू व्यक्तींसाठी सुवर्णसंधी!
तत्काळ भरती - नवी संधी
महासागर, विदर्भाचे प्रसिद्ध मराठी दैनिक, ५५ वर्षांचा अनुभव असलेले, विदर्भ, मुंबई, पालघर आणि नाशिक येथे प्रकाशित होणारे, गरजू व्यक्तींसाठी सुवर्णसंधी!
१. समाचार संपादक (न्यूज एडिटर)
- मराठीमध्ये उत्कृष्ट कमांड
- ५ वर्षांचा अनुभव
२. असिस्टंट जाहिरात व्यवस्थापक (एडव्हर्टायझमेंट असिस्टंट मॅनेजर)
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
- शेड्युलिंगचे ज्ञान
३. इव्हेंट मॅनेजर
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
- पुरुष/महिला
४. सर्क्युलेशन मॅनेजर
- विदर्भातील जिल्ह्यांचे ज्ञान आवश्यक
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
५. एकाउंटंट
- पुरुष/महिला
- न्यूजपेपर बिलिंग आणि अकाउंटन्सीचे ज्ञान आवश्यक
अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
मुलाखत दिनांक व वेळ
• दिनांक: मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ • वेळ : दु.१२:०० ते ३:०० वाजेपर्यंत
स्थान: महासागर, चांडक ले-आउट, कॉटन मार्केट, नागपूर
आपले बायोडाटा आणि आवश्यक दस्तऐवज साथ लावून उपस्थित राहावे.






## ठाकरे गटात मोठी कारवाई
### तीन पदाधिकाऱ्यांना बाहेरचा रस्ता



**मुंबई :** राहाता- शिर्डी परिसरात उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेत मोठा राजकीय भूकंप झाल्याचे दिसून आले आहे. पक्षविरोधी कारवाईचा ठपका ठेवत राहाता नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र पठारे, माजी नगरसेवक सागर लुटे आणि नगरसेविका उज्वला होले यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचा निर्णय जाहीर होताच स्थानिक शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी उसळली. पत्रकार परिषदेत काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना भावनांनी भरून येत अश्रू अनावर झाले. या तिघांनी नगरपालिका निवडणुकीत उमेदवारीची इच्छा व्यक्त केली होती, मात्र एबी फॉर्मच्या वादावरून त्यांच्यावर कडक कारवाई झाली असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे. नगरपालिका निवडणूक जवळ येत असताना पदाधिकाऱ्यांवर अशी कारवाई झाल्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला आहे. राजेंद्र पठारे हे नगराध्यक्षपदासाठी इच्छुक होते, तर सागर लुटे आणि उज्वला होले यांनी नगरसेवकपदासाठी तयारी केली होती. मात्र, महाविकास आघाडीचा भाग न बनता तसेच पक्षाचा एबी फॉर्म विनापरवानगी भरल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. पक्षाचे वरिष्ठ नेते अनिल देसाई यांनी एबी फॉर्म चोरला, असा गंभीर आरोप केल्याची माहितीही समोर आली असून, यामुळे कारवाईची तीव्रता अधिक वाढली. या घडामोडींवर नाराज गटाने पत्रकार परिषद घेत पक्षातील हस्तक्षेपाबद्दल थेट काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर निशाणा साधला. राजेंद्र पठारे यांनी भावनिक आवेशात टीका करत म्हटले की, ही ठाकरे सेना राहिलेली नाही, तर कोल्हे-थोरात सेना म्हणजेच डळ सेना बनली आहे. काँग्रेस नेत्यांचा शिवसेनेतील उमेदवारी आणि संघटनातील निर्णयांवर वाढता प्रभाव हा मुख्य वादाचा मुद्दा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रहाताझशिर्डी तालुक्यात काँग्रेसचा हस्तक्षेप वाढत चालल्यामुळे निष्ठावंत शिवसैनिकांना दुय्यम स्थान देण्याची पद्धत तयार झाली असल्याचा नाराज नेत्यांचा आरोप आहे.

# मुंबईतील भाडेकरूंना मोठा दिलासा
## ६०० चौरस फुटांपर्यंत नोंदणी फी माफ, राज्य सरकारचा मोठा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

मुंबईतील पुनर्विकास प्रक्रियेतील भाडेकरूंना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासादरम्यान नवीन इमारतीत जागा मिळणाऱ्या भाडेकरूंना आता नोंदणी फीपासून पूर्ण सवलत देण्यात येणार आहे. आतापर्यंत 400 चौरस फुटापर्यंत ही सवलत लागू होती. मात्र यामध्ये मोठा बदल करत सरकारने मर्यादा थेट 600 चौरस फुटांपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे नागरिकांना आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होणार असून पुनर्विकास प्रक्रिया अधिक गतीने होण्याची शक्यता आहे.

नवीन धोरणानुसार भाडेकरूला मिळणाऱ्या घराचे क्षेत्रफळ 200 चौरस फुटांनी वाढले तरीही नोंदणी फी आकारली जाणार नाही. अनेक वर्षांपासून जुन्या, जर्जर इमारतींमध्ये राहणाऱ्या भाडेकरूंना पुनर्विकासाच्या प्रक्रियेमध्ये नोंदणी शुल्काचा मोठा बोजा पडत होता. या शुल्कामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक अडचण वाढत होती. त्यामुळे ही फी माफ करण्याचा निर्णय हा सामान्य नागरिकांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे. राज्य सरकारने पुनर्विकास प्रक्रियेतील अडथळे कमी करण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून विविध पातळीवर प्रयत्न केले असून ही सवलत त्याच धोरणाचा पुढील टप्पा मानला जात आहे.



महसूल विभागाने या संदर्भात एक परिपत्रक जारी केले असून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना विशिष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या पत्रात म्हटले आहे की मार्गदर्शक सुचना 2(अ) आणि 2(ब) मधील बदल केवळ क्लस्टर डेव्हलपमेंट प्रकल्पांना लागू असतील. त्यामुळे व्यक्तिगत पुनर्विकास किंवा छोट्या प्रकल्पांमध्ये ही तरतूद लागू होणार नाही. शिवाय या सवलतीमुळे सन 2025-26 साठी तयार करण्यात आलेल्या वार्षिक मूल्यदर तक्त्यात कोणतीही वाढ किंवा घट होणार नाही, याची काटेकोर खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. म्हणजेच सध्याच्या आर्थिक वर्षातील कर रचनेत कोणताही बदल होऊ नये, यावर सरकारने स्पष्ट भर दिला आहे.

याशिवाय महसूल विभागाने हेही सूचित केले आहे की, जर प्रस्तावित बदलांमुळे वार्षिक मूल्यदर तक्त्यात वाढ किंवा घट होण्याची शक्यता निर्माण झाली, तर ती बदल 1 एप्रिल 2026 पूर्वी अंमलात येऊ नयेत. यामुळे सरकारने नियमात तातडीचा बदल न करता नागरिकांवर किंवा महापालिकेच्या कर व्यवस्थेवर परिणाम होणार नाही याची खात्री केली आहे. पुनर्विकासाशी संबंधित नोंदणी प्रक्रिया स्पष्ट व पारदर्शक करण्यासाठी राज्य शासनाने घेतलेले हे पाऊल प्रशासनिकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे. महसूल विभागाचे अधिकारी, नियोजन विभाग आणि पुनर्विकासातील संबंधित संस्था या सर्वांना या सूचनांचे पालन करावे लागणार आहे.

मुंबईतील पुनर्विकास हा गेल्या दोन दशकांपासून कायमच चर्चेचा विषय राहिला आहे. विशेषतः दक्षिण आणि मध्य मुंबईतील अनेक जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात नोंदणी फी, स्टॅम्प ड्यूटी आणि इतर शुल्कांमुळे नागरिकांना होणारा आर्थिक भार मोठा होता. नव्या निर्णयामुळे पुनर्विकासाला नवी गती मिळेल, तसेच नागरिकांचा विश्वासही वाढेल अशी अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका क्षेत्रातील पुनर्विकासातील अडथळे कमी करण्यावर भर देत हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. भविष्यात पुनर्विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आणखी काही सवलती देण्याची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे.

## दिल्ली मेट्रो स्टेशनवरून उडी घेत विद्यार्थ्याची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**



सांगलीच्या एका विद्यार्थ्याने शाळेतील शिक्षकांच्या कथित जाचाला कंटाळून दिल्लीतील मेट्रो स्टेशनवरून उडी मारत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. आत्महत्येपूर्वी या विद्यार्थ्याने एक सुसाइड नोट लिहिली असून, त्यात त्याने आपल्या पालकांची क्षमायाचना केली आहे. तसेच आपले अवयव एखाद्या गरजवंताला देण्याचीही सूचना केली आहे. दहावीच्या शौर्य पाटीलने आत्महत्या का केली?:शिक्षिकांनी असे काय केले की त्याने मृत्यूलाच कवटाळले? वडिलांनी सर्वकाही सांगितले. यासंबंधीच्या माहितीनुसार, शौर्य प्रदीप पाटील (16) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो दिल्लीतील सेंट कोलंबस शाळेचा विद्यार्थी होता. त्याने शाळेतील शिक्षकांच्या जाचाला कंटाळून मंगळवारी दिल्लीच्या राजेंद्रनगर मेट्रो स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक 2 वरून उडी घेत आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेनंतर त्याला तातडीने लगतच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण तत्पूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. शौर्य याचे वडील प्रदीप सोने - चांदी गलाई व्यवसायाच्या निमित्ताने दिल्लीत स्थायिक झालेत. ते राजीव नगर भागात राहतात. हे कुटुंब मूळचे सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील ढवळेश्वर येथील आहे.

## भाषेवरून लोकलमध्ये मारहाण
### तणावातून विद्यार्थी अर्णव खैरेची आत्महत्या



**मुंबई :** कल्याण येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेमुळे पुन्हा एकदा लोकलमधील प्रवास किती असुरक्षित आहे याची जाणीव झाली आहे. डोंबिवली-ठाणे या मार्गावर लोकलमध्ये किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून 19 वर्षीय अर्णव खैरे या विद्यार्थ्यावर झालेल्या मारहाणीचा परिणाम इतका गंभीर झाला की त्याने मानसिक तणावाखाली आत्महत्या केल्याची घटना उघड झाली आहे. मराठी-हिंदी बोलण्यावरून सुरू झालेला हा वाद शेवटी दुदैवी शेवटाला जाऊन ठेपला. अर्णवच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी सुरू झाली आहे. अर्णव खैरे हा कल्याण पूर्व येथील सहजिवन रेसिडेन्सीमध्ये आपल्या कुटुंबासोबत राहत होता. तो मुलुंड येथील केळकर कॉलेजमध्ये विज्ञान शाखेचा विद्यार्थी होता आणि रोजप्रमाणेच 18 नोव्हेंबर रोजी सकाळी तो कल्याणहून कॉलेजला जाण्यासाठी लोकलने निघाला. ट्रेनमध्ये नेहमीप्रमाणे प्रचंड गर्दी होती. या गर्दीत अर्णवने जागा मिळावी म्हणून हिंदीत थोडा आगे हो एवढेच शब्द उच्चारले होते. त्याचवेळी आजूबाजूला उभ्या असलेल्या चार-पाच तरुणांनी त्याला वेढले व तुला मराठी बोलता येत नाही का?, मराठी बोलायला लाज वाटते का? अशा प्रश्नांनी त्याला त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर या तरुणांनी अर्णवला ढकलणे, बुक्क्या मारणे असा हल्ला केल्याचे समजते. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे अर्णव पूर्णपणे घाबरून गेला.

## सह्याद्रीत टायगर कमबॅक
### चांदोलीत वाघीणीची यशस्वी जंगलात मुक्तता



■ **महासागर प्रतिनिधी, सांगली, दि. २० :**

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाने व्याघ्रसंख्यावाढीत आज एक ऐतिहासिक पाऊल टाकत चांदोली राष्ट्रीय उद्यानात नियंत्रित पिंजऱ्यात ठेवण्यात आलेल्या STR T–04 या वाघीणीला नैसर्गिक जंगलात यशस्वीरीत्या मुक्त केले. गेल्या काही महिन्यांपासून तिचे वैज्ञानिक पद्धतीने निरीक्षण, अनुकूलन व प्रशिक्षण करण्यात आले होते. 18 नोव्हेंबरला एनक्लोजरचा दरवाजा उघडा ठेवण्यात आला असला तरी वाघीण दोन दिवस आतच फिरत राहिली होती. त्या काळात तिने एनक्लोजरमध्येच शिकार केली आणि नैसर्गिक जीवनशैलीचे सर्व संकेत दर्शवले. अखेर 21 नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता ती अतिशय शांत, डौलदारपणे दरवाजातून बाहेर पडली आणि जंगलाच्या दिशेने मार्गक्रमण करत मोकळ्या वनक्षेत्रात प्रवेश केला.

वाघीणीच्या चांदोली आगमनानंतर तिला जंगलातील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी अनुकूलन प्रक्रिया राबविण्यात आली. या काळात तिची शिकार करण्याची प्रवृत्ती, नैसर्गिक परिस्थितींना दिलेली प्रतिक्रिया, क्षेत्रचिन्हीकरणाची पद्धत आणि हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता यांचा अभ्यास करण्यात आला. भारतीय वन्यजीव संस्था येथील वैज्ञानिक, पशुवैद्यकीय अधिकारी आणि वन विभागाचे तज्ज्ञ पथक तिला दररोज तपासत होते. अखेर सर्व निरीक्षणानंतर ती संपूर्णपणे तंदुरुस्त असून जंगलातील स्वतंत्र जीवनासाठी पूर्ण योग्य असल्याचा अहवाल तज्ज्ञांनी दिला. वाघीणीच्या मुक्तीनंतर तिला सतत निरीक्षणाखाली ठेवण्यासाठी अत्याधुनिक रेडिओ कॉलर प्रणाली बसविण्यात आली आहे. त्यासाठी सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, चांदोली राष्ट्रीय उद्यान आणि हक्कया सर्व संस्थांचे प्रशिक्षित पथक तयार ठेवण्यात आले आहे. तिच्या निवासस्थानी बदल, शिकार पद्धती, मानवी वस्त्यांपासून अंतर, नैसर्गिक हालचाली यांची नोंद सातत्याने घेतली जाईल. अचानक परिस्थिती निर्माण झाल्यास तत्काळ मदत पोहोचविण्यासाठी टीमही सज्ज ठेवण्यात आली

## १०० उठाबशा काढायला सांगणाऱ्या शिक्षिकेला अटक

■ **महासागर प्रतिनिधी**
**पालघर, दि. २० :**

पालघर जिल्ह्यात, सहावी इयत्तेत शिकणाऱ्या काजलच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांनी गुरुवारी महिला शिक्षिका ममता यादव हिला अटक केली. तिच्यावर मुलीला 100 उठाबशा काढायला लावल्याचा आरोप होता. तिच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वालीव पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ही घटना ८ नोव्हेंबर रोजी घडली, शिक्षिकेने मुलीला 10 मिनिटे उशिरा आल्याबद्दल 100 उठाबशा



काढाण्याची शिक्षा दिली. यामुळे तिची तब्येत बिघडली आणि पाच दिवसांनी १३ नोव्हेंबर रोजी उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर, बीईओने चौकशीचे आदेश दिले. शिक्षिका ममता हिला सातीवली येथील खाजगी शाळेतून आधीच काढून टाकण्यात आले होते.

मुलीच्या मृत्यूनंतर, स्थानिक रहिवासी आणि मनसे कार्यकर्त्यांनी निषेध केला, ज्यामुळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. काजलच्या आईनेही शाळा प्रशासनावर मदत न केल्याचा आरोप केला आहे.

### आई म्हणाली - मुलीला वेदना होत होत्या

काजलची आई शीला यांनी सांगितले की, शाळेत उशिरा आल्यामुळे इतर मुलांसह तिच्या मुलीलाही पाठीवर स्कूलबॅग घेऊन 100 उठाबशा काढायला लावल्या. काहींनी ५० ते १०० उठाबशा काढल्या. मुलीने घरी आल्यानंतर पाठदुखीची तक्रार केली आणि तिची प्रकृती आणखी बिकट झाली. तिला प्रथम आस्था रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी सांगितले की, तिची पाठ दुखतेय, परंतु कोणताही आजार नाही. परंतु, तिला तीव्र वेदना होत होत्या.

## आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेला युसीआय मान्यता

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. २० :**

पुणे येथे १९ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुणे ग्रँड टूर २०२६- साठी ३५ देशांच्या प्रतिनिधींच्या सहभागाला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून तत्त्वतः ना हरकत देण्यात आली आहे.

प्रशासनाने पुढाकार घेत सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफआय) यांच्या माध्यमातून या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेला आंतरराष्ट्रीय सायकल संघटना अर्थात युसीआय युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलची (युसीआय) मान्यता मिळाली असून त्यांच्या दैनंदिनीत समाविष्ट करण्यात आली आहे. या स्पर्धेत भारतासह अल्बानिआ, अल्जेरिया, अमेरिकन समोआ, ऑस्ट्रेलिया, बहारिन, बल्गेरिया, बुर्किना फासो, चीन, झेक रिपब्लिक, इस्टोनिया, फ्रान्स, जर्मनी, गुआम, हाँगकाँग, इंडोनेशिया, इटली, जपान, रिपब्लिक ऑफ कोरिया, मलेशिया, मालदीव्ज, मंगोलिया, मोरोक्को, नेदरलँड्स, नायजेरिया, फिलीपीन्स, सौदी अरेबिया, श्रीलंका, स्वीडन, स्वीत्झर्लंड, थायलंड, युनायटेड अरब एमिरातस्, युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका या देशांच्या नामांकन केलेल्या खेळाडू, प्रतिनिधींच्या सहभागाला तत्त्वतः ना हरकत देण्यात आली आहे.

याबाबतचे पत्र परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांडून सायकलिस्ट फेडरेशन ऑफ इंडियाच्या महासचिवांना देण्यात आले आहे अशी माहिती देण्यात आली आहे.

आयोजकांकडील निमंत्रण पत्र, व्हिजा विषयक नियमांचे पालन आणि आवश्यक तेथे संबंधित यंत्रणांच्याकडून मान्यता मिळण्याच्या अधीन राहून ही मान्यता देण्यात आली आहे.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने तत्त्वतः ना- हरकत दिल्याने स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलपटूंचा सहभाग वाढेल आणि उत्तम सायकलपटूंचे कौशल्य पाहण्याची संधी क्रीडाप्रेमींना मिळणार आहे.

## भरधाव ट्रकची दुचाकीला धडक महिलेचा घटनास्थळी मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

गोवंडी परिसरातून भरधाव वेगात धावणाऱ्या एका ट्रकने मंगळवारी दुचाकीवरून जाणाऱ्या तिघांना धडक दिली. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या दोघांवर शीव रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातात सरस्वती पूछला (४२) यांचा मृत्यू झाला. त्या मुळच्या आंध्र प्रदेश येथील रहिवासी होत्या. गोवंडीच्या शिवाजी नगर परिसरात वास्तव्यास असलेल्या त्यांच्या एका नातेवाईकाचा मंगळवारी मृत्यू झाला. त्या अंत्यसंस्कासाठी गोवंडी येथे आल्या होत्या. त्या देवनार येथील स्मशानभूमीत भाच्यासोबत दुचाकीवरून जात होत्या. यावेळी आणखी एक जण त्यांच्या दुचाकीवर बसला. शिवाजी नगर सिग्नल परिसरातून त्यांची दुचाकी जात होती. त्याच वेळी तेथे भरधाव वेगात आलेल्या ट्रकने त्यांना धडक दिली. या अपघातात दुचाकीवर बसलेले सरस्वतीसह तिघे गंभीर जखमी झाले.

## हमीभाव खरेदी प्रक्रियेत बारदाना कमी पडणार नाही याची दक्षता घ्यावी : जयकुमार रावल



**मुंबई :** राज्यात किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत खरीप हंगाम 2025-26 करिता सोयाबीन, उडीद आणि मूगाच्या हमीभावाने खरेदीसाठी 30 ऑक्टोबर पासून शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. मंगळवार 18 नोव्हेंबरपर्यंत दोन लाख 20 हजार 316 शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. 12 फेब्रुवारी 2026 पर्यंत होणाऱ्या खरेदीदरम्यान बारदान्याची कमतरता भासणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी यंत्रणांना दिले. पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित बैठकीत किमान आधारभूत खरेदी किंमत योजनेअंतर्गत खरेदी प्रक्रिया आणि बारदाना उपलब्धतेसंदर्भात आढावा घेण्यात आला. प्रधान सचिव प्रवीण दराडे, मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे पाटील, सहसचिव विजय लहाने, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम हे तर पणन संचालक, नाफेड आणि एनसीसीएफचे राज्यप्रमुख ऑनलाईन उपस्थित होते. खरेदी केंद्रांसाठी शासनास 725 प्रस्ताव प्राप्त झाले.

## कुंभमेळ्यापूर्वी नाशिकला केंद्र सरकारकडून १०० इलेक्ट्रिक बसेस

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २० :**

कुंभमेळ्यापूर्वीच केंद्र सरकारकडून महापालिकेला 100 इलेक्ट्रिक बसेस (पीएमपी) मिळणार आहेत. त्यासाठीची सर्व कामे पूर्ण करण्याचे आदेश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज यांनी बुधवारी (दि. 20) दिले. गोविंदराज यांनी महापालिकेतील अधिकाऱ्यांसोबत ऑनलाइन बैठक घेऊन आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून थकीत असलेले चार कोटी रुपयांचे अनुदान लवकर मंजूर केले जाईल असे आश्वासन दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या इ-बसेससाठी आडगाव येथे डेपो बांधला जात असून वीज जोडणी करण्याचे महावितरणचे काम आता



अंतिम टप्प्यात आले आहे. प्रधान सचिवांच्या या सूचनांमुळे नाशिक महापालिकेने कामांना गती दिली आहे. मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, सिटी लिंकचे सीईओ विजयकुमार मुंडे आणि इतर अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

# डिसेंबर अखेर महामेट्रो मिरा-भाईदरकरांच्या सेवेत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

या वर्षीच्या डिसेंबर अखेर दहिसर ते काशीमिरा मार्गावर मेट्रो सुरू करण्याचे नियोजन असून मिरा-भाईंदरवासियांसाठी हा एक आनंदाचा क्षण असणार आहे. तब्बल 14 वर्षाच्या पाठपुराव्याला यश येत असून मिरा-भाईंदरवासियांचे स्वप्न पूर्णत्वास येत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी दहिसर ते काशीमिरा या मेट्रो मार्गाची पाहणी दौरा केला, त्यावेळी ते बोलत होते. त्यांच्या सोबत महामेट्रोचे अधीक्षक अभियंता व त्यांची तंत्रज्ञ सल्लागार कंत्राटदार टीम उपस्थित होती.

मंत्री सरनाईक म्हणाले की, सन 2009 मध्ये जेव्हा या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलो, त्यावेळी येथील नागरिकांना मेट्रोचे स्वप्न दाखवले होते. गेल्या 14 वर्षांमध्ये सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश येताना दिसत आहे. 2014 मध्ये



तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नगर विकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यामुळे दहिसर ते काशीमिरा या मेट्रो प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली. लवकरच हा मार्ग सुरू झाल्यानंतर मीरा-भाईंदरवासीय मेट्रोने अंधेरीपर्यंत जाऊ शकतील. तसेच तेथून

**प्रताप सरनाईक यांची माहिती**

मेट्रो-1 चा वापर करून एअरपोर्ट स्थानक-3 मधून थेट कुलाब्यापर्यंत देखील जाऊ शकतील. त्याचबरोबर, नवीन वर्षात मिरा-भाईंदरवासीयांसाठी छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक मंत्रालय, विधान भवन येथे जाण्यासाठी मेट्रोची नेटवर्कद्वारे सुविधा उपलब्ध असणार आहे.

दहिसर - काशीमिरा मेट्रो डिसेंबर-2026 पर्यंत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत विस्तारित होणार आहे. त्याबरोबरच वसई - विरार मेट्रो लाईनचे काम देखील लवकरच सुरू करण्यात येईल. त्यामुळे वसई - विरारपासून अंधेरी आणि तिथून विमानतळ स्थानक इंटरचेंजने थेट कुलाब्यापर्यंत मेट्रोची सेवा पुढील काही वर्षांमध्ये सुरू होऊ शकते, अशी आशा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी व्यक्त केली.

दहिसर ते काशीमिरा या नव्या मेट्रो मार्गाला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे (सीएमआरएस) प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. ते मिळाल्यानंतर डिसेंबर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या नवीन मेट्रो मार्गाचे लोकार्पण करण्याचे नियोजन करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.

# शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा का सुनावण्यात आली?

बांगलादेशच्या इंटरनॅशनल क्राइम्स ट्रिब्यूनलने माजी पंतप्रधान शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी शेख हसिना यांना सुनावण्यात आलेल्या शिक्षेचे स्वागत केले असून भारताने शेख हसिना यांना बांगलादेशच्या स्वाधीन करावे असे आव्हान केले. दोन वर्षापूर्वी बांगलादेशमध्ये जो उठाव झाला त्या उठावानंतर बांगलादेशमध्ये सत्तेवर असलेल्या त्या देशाच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसिना यांनी भारतात पलायन केले त्या अजूनही भारतातच आश्रयाला आहेत. शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्यानंतर बांग्लादेशात पुन्हा हिंसाचार उसळला शेख हसिना यांच्या समर्थकांनी बांग्लादेशात धुडगूस घातला अजूनही तेथे उग्र निदर्शने होत आहेत मात्र तेथील हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस हे आंदोलकांना दाद देत नाहीत. मोहम्मद युनूस यांनी तेथील प्रसार माध्यमांना शेख हसिना यांची या शिक्षेवरील प्रतिक्रियाही छापण्यास मनाई केली आहे. मोहम्मद युनूस शेख हसिना यांना लवकरात लवकर मृत्युदंड देण्यावर ठाम आहे पण भारत शेख हसिना यांना बांगलादेशच्या स्वाधीन करेल असे वाटत नाही.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

शेख हसिना या भारताच्या आश्रित आहे आहे त्यांची सुरक्षा ही भारताची जबाबदारी आहे. शेख हसिना यांना सुनावण्यात आलेली शिक्षा अपेक्षितच होती कारण काही महिन्यापूर्वी भारतीय प्रसार माध्यमांशी बोलताना शेख हसिना यांनी बांग्लादेशात परतण्याची घोषणा केली होती. शेख हसिना यांनी बांग्लादेशात परतण्याची घोषणा केल्यापासून मोहम्मद युनूस हे अस्वस्थ आहेत. पंतप्रधान पदावर असलेल्या शेख हसिना यांना हिंसक निदर्शनांमुळे देश सोडवा लागल्यावर तात्पुरती व्यवस्था म्हणून हंगामी सरकार स्थापन करण्यात आले. या सरकारचे हंगामी प्रमुख म्हणून नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांची नियुकी करण्यात आली. त्यांची नियुक्ती करण्यात आली त्याचवेळी सांगण्यात आले की सहा महिन्याच्या आत निवडणूका घेऊन लोकनियुक्त सरकार स्थापन करण्यात येईल मात्र दोन वर्ष झाली तरी मोहम्मद युनूस निवडणुकीची घोषणा करत नाही. त्यांना भीती आहे की निवडणूक झाली तर ते पुन्हा पंतप्रधान होणार नाहीत.

काहीही करून आपली खुर्ची टिकवण्यासाठी ते धडपडत आहेत त्यासाठी ते अमेरिका पाकिस्तान आणि चीनची मदत घेत आहेत. शेख हसिना यांच्या विरोधात झालेल्या आंदोलनामागे अमेरिका होती हे आता लपून राहिले नाही. अमेरिकेला बांगलादेशातील सेंट मार्टिन हे बंदर हवे आहे. शेख हसिना अमेरिकेस हे बंदर देण्यास उत्सुक नव्हत्या त्यामुळेच अमेरिकेने बांगलादेशातील शेख हसिना यांच्यावर नाराज असलेले नागरिक तसेच कट्टरपंथीयांना हाताशी धरून शेख हसिना यांचे पंधरा वर्षाचे सरकार उधळून लावले. पाकिस्तान आणि चीनलाही त्या नकोशा होत्या कारण सत्तेवर असताना त्यांचे भारताशी सौहादार्चे संबंध होते पाकिस्तान आणि चीनला त्या नकोशा होत्या म्हणून त्यांनीही या आंदोलनाला हवा दिली आणि मोहम्मद युनूस नावाचे बाहुले आणून बसवले. हेच मोहम्मद युनूस आज अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांच्या नादी लागून भारताला पाण्यात पाहत आहेत. मोहम्मद युनूस जितके दिवस खुर्चीवर राहतील तितका अमेरिका, पाकिस्तान आणि चीनचा फायदा होणार आहे. पुढील काही महिन्यात मोहम्मद युनूस हे सेंट मार्टिन बेट अमेरिकेच्या घशात घालणार आहेत. जर शेख हसिना बांग्लादेशात आल्या आणि निवडणुका झाल्या तर नवीन सरकार आपल्या विचारांचे असेलच असे नाही आणि जर शेख हसीनांचेच सरकार पुन्हा आले तर त्या भारताशीच मैत्री करणार हे चीन आणि पाकिस्तान जाणून आहेत त्यामुळे त्यांनी बांगलादेशात येऊच नये आणि जरी आल्या तरी त्यांना थेट ढगात पाठवून आपले मनसुबे पूर्ण करण्याचा अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांचा डाव आहे त्यासाठीच शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

# जिल्ह्यातील २ लक्ष ४२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १९१ कोटी मदत जमा

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

जिल्ह्यात जुन ते ऑक्टोबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टी नुकसान मदत व शेतकरी अनुदान वाटपांतर्गत जिल्ह्यातील २ लक्ष ४२ हजार ३३५ शेतकऱ्यांच्या खात्यात १९१ कोटी ७ लक्ष ७ हजार निधी डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात आले.

जुन ते ऑक्टोबर दरम्यान अतिवृष्टी, आपत्तीच्या अनुषंगाने शासनातर्फे मदत जाहीर करण्यात आली. जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी वेळोवेळी बैठका घेऊन शेतकरी बांधवांना तातडीने मदत मिळण्यासाठी जलद कार्यवाही राबविण्यात निर्देश



दिले. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनातर्फे पंचनाम्याची प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार अतिवृष्टीग्रस्त शेतकरी बांधवांना मदत प्राप्त झाली आहे. अकोला तालुक्यात ४१ हजार ७१ शेतकऱ्यांच्या खात्यात ३४ कोटी ६७ लक्ष ४४ हजार, तसेच अकोट तालुक्यात ३७ हजार ३६६ शेतकऱ्यांच्या खात्यात ३२ कोटी ९२ लक्ष ७८ हजार, बाळापूर तालुक्यात ३७ हजार ४४८ शेतकऱ्यांच्या खात्यात २८ कोटी ४८ लक्ष ३८ हजार निधी जमा झाला आहे. बार्शिटाकळी तालुक्यात २९ हजार १४८ शेतकऱ्यांच्या खात्यात २५ कोटी १४ लक्ष ११ हजार, निधी, मुर्तीजापूर तालुक्यात ४२ हजार ६८५ शेतकऱ्यांच्या खात्यात २६ कोटी ५८ हजार, पातूर तालुक्यात २४ हजार ७४९ शेतकऱ्यांच्या खात्यात २० कोटी ७८ लक्ष ९२ हजार व तेल्हारा तालुक्यात २९ हजार ८६८ शेतकऱ्यांच्या खात्यात २३ कोटी ४ लक्ष ८६ हजार निधी जमा झाला आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षा २३ नोव्हेंबरला; जिल्ह्यात २० परीक्षा केंद्रे

## केंद्रांवर कडक बंदोबस्त

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महा टेट २०२५) दि. २३ नोव्हेंबरला होणार आहे. जिल्ह्यात एकूण २० परीक्षा केंद्रे असतील. परीक्षेत पहिला पेपर सकाळी १०:३० ते दु. १ या वेळेत व दुसरा पेपर दुपारी २:३० ते ५ या कालावधीत होईल. पहिल्या पेपरसाठी एकूण १४ केंद्रे निश्चित असून, ४ हजार २०० परीक्षार्थी व दुस-या पेपरसाठी एकूण २० केंद्रांची निश्चित असून, परीक्षार्थी ५ हजार ५९४ आहेत. दोन्ही पेपर मिळून ९ हजार ७९४ परिक्षार्थी परीक्षेला बसतील. त्यातील १५९ परिक्षार्थी हे दिव्यांग असून त्यांना नियम ानुसार अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील. परीक्षार्थींना ओळखीचा पुरावा व परीक्षेचे प्रवेशपत्र सोबत ठेवणे बंधनकारक आहे.

जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेतील जिल्हास्तर परीक्षा आयोजन व संनियंत्रण समितीमार्फत आयोजन होते. जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी हे समितीचे उपाध्यक्ष व प्राथमिक शिक्षणाधिकारी हे सदस्य सचिव आहेत. परीक्षेच्या सुयोग्य आयोजनासाठी प्राथमिक शिक्षणाधिका-यांच्या कार्यालयात जिल्हा सनियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात



आली आहे.परिक्षेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी १ जिल्हा परीरक्षक, ५ झोनल अधिकारी, २० सहायक परीरक्षक, २० केंद्र संचालक, ५२ पर्यवेक्षक व २४१ समवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रावर गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी परीक्षार्थींना बायोमेट्रिक सिस्टीम, फेस स्कॅनिंग, मेटल डिटेक्टर यांच्या तपासणीतून जावे लागेल.प्रत्येक परीक्षा केंद्रावर व प्रत्येक वर्गखोलीत सर्व परीक्षार्थी हे एआय तंत्रज्ञानावर आधारित लाईव्ह सीसीटीव्हीच्या निगराणीत असणार आहेत. यावर्षी नव्यानेच सर्व परिक्षार्थी यांचे ‘फोटो व्ह्यू‘ सिस्टीमद्वारे तपासणी होणार आहे. यामुळे डमी उमेदवार ओळखण्यास मदत होणार आहे. तसेच ‘कनेक्ट व्ह्यू‘ या तंत्रज्ञानाद्वारे सर्व केंद्र संचालक, जिल्हा सनियंत्रण कक्ष व परिक्षा परिषद, पुणे यांच्यात हॉट लाईनची सुविधा उपलब्ध होणार आहे. सेंटर कोड डायल करताच क्षणात संपर्क साधता येणार आहे.दिवसभर सूचना देण्याची आणि प्राप्त करण्याची नोंद स्वयंचलितरीत्या जतन होणार असल्याने परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व नियंत्रण येणार आहे. परीक्षा परिषदेच्या या नव्या पावलांमुळे यंदाची टीईटी इतिहासातील सर्वाधिक कडक नियमनाखाली घेण्यात येणार असल्याचे दिसत आहे. परीक्षेसाठी शिक्षणाधिकारी (माध्य.), शिक्षणाधिकारी (योजना) यांच्या भरारी पथकाची केंद्रावर नजर राहणार असून शिक्षणाधिकारी (प्राथ.) हे भरारी पथकासह संपूर्ण परिक्षेचे नियंत्रण अधिकारी म्हणून परिक्षेच्या संपूर्ण कार्यवाहीवर बारकाईने लक्ष ठेवून असतील. अकोला जिल्ह्यातील परीक्षा केंद्रे : खंडेलवाल ज्ञान मंदिर विद्यालय, जसनागरा पब्लिक स्कुल, रिधोरा, श्री समर्थ पब्लिक स्कुल, भिकमचंद खंडेलवाल विद्यालय, अकोला, द नोएल इंग्लिश सीबीएससी स्कूल, अकोला, श्री शिवाजी हायस्कूल, मुख्य शाखा, अकोला, न्यू इंग्लिश हायस्कूल, भारत विद्यालय, श्री शिवाजी महाविद्यालय, स्कुल ऑफ स्कॉलर्स, जागृती विद्यालय, मोहरीदेवी खंडेलवाल विद्यालय, श्री सरस्वती इंग्लिश विद्यालय, श्री समर्थ पब्लिक स्कुल, रिधोरा, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय.

# अपघातग्रस्त वृद्धाच्या मदतीसाठी अकोलेकरांची धावाधाव

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

## कृषी विद्यापीठासमोर दूभाजकावर अपघात

अपघात झाल्यानंतर त्याचे व्हिडीओ शुटिंग करणारे शेकडो व्हिडीओ तुम्ही पाहिले. पण, अकोलेकर मात्र अपघात झाल्यावर पहिले अपघातग्रस्तांना मदतीसाठी धावून जातात. अकोलेकरांच्या मदतीचा हात कृषी विद्यापीठासमोर झालेल्या अपघाताच्या वेळी समोर आला.शहरातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठासमोरच्या मुख्य रस्त्यावर आज सकाळी एक भीषण अपघात घडला. एका भरधाव दुचाकीची अचानक रस्त्याच्या दुभाजकावर जोरदार धडक बसली. या धडकेत अंदाजे ६० ते ६५ वर्षे वयोगटातील एक वृद्ध व्यक्ती गंभीर जखमी झाली. अपघात इतका भीषण होता की, वृद्ध रस्त्यावर कोसळल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक बनली होती. मात्र, अपघातानंतर लगेचच आजूबाजूच्या नागरिकांनी मानवतावादी दृष्टिकोन दाखवत मदतीसाठी तत्परता दाखवली. जखमी व्यक्तीला त्याच अवस्थेत रस्त्यावर पडलेले पाहून, उपस्थित नागरिक आणि वाटसरूंनी तात्काळ धाव घेतली. कोणतीही सरकारी मदत किंवा रुग्णवाहिकेची वाट न पाहता, नागरिकांनी त्यांना रस्त्यावरून उचललेआणि तातडीने एका ऑटोरिक्षामध्ये बसवले. डोक्याला मार लागल्याने वृद्धाची अवस्था अत्यंत गंभीर होती, त्यामुळे त्यांना त्वरित उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या संकटकाळात अकोलेकर नागरिकांनी दाखवलेल्या एकजुटीमुळे आणि तत्परतेमुळे जखमीला वेळेवर उपचार मिळू शकले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, ते पुढील तपास करत आहेत.

## थोडक्यात

### मनपा क्षेत्रात २५ MLD प्लांटवरून होणारा पाणी पुरवठा दोन दिवस बंद राहणार

**अकोला :** कान्हेरी जवळ बार्शिटाकळी रोड वर ६०० मिमी.व्यासाच्या मुख्य जलवाहिनी वर अचानक लिकेज उद्भवल्याने २५ एम.एल.डी. प्लांट वरून होणारा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. लिकेज दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले असून दुरुस्ती होईपर्यंत दि. २१ आणि २२ नोव्हेंबर रोजी २५ चडऊ प्लांटवरून शिव नगर, आश्रय नगर, बस स्टँड जल कुंभ तसेच शिवणी, शिवर, शिवापूर येथे होणारा नियोजीत पाणीपुरवठा बंद राहील याची शहरातील नागरिकांनी नोंद घ्यावी व अकोला महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग महानगरपालिका यांनी केले आहे.अकोला शहरातील नागरीकांनी पाण्याची पुरेशी साठवणुक करुन पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा.

### सीए विद्यार्थ्यांसाठी अकोल्यात एआय कार्यशाळा

**अकोला :** सीए विद्यार्थ्यांच्या विकासा अकोलाच्या वतीने आर्टिफिशियल इंटेलिजेंस: अंडरस्टैंडिंग फॉर राईजिंग अचिव्हर्स ही दोन दिवसांची विशेष एआय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.या कार्यशाळेचा उद्देश सीए विद्यार्थ्यांना आधुनिक एआय तंत्रज्ञानाची आणि त्यांच्या व्यावहारिक अनुप्रयोगांची ओळख करून देणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात विकासा अकोलाचे अध्यक्ष सीए प्रतीक मंत्री यांच्या स्वागत भाषणाने झाली, त्यांनी सांगितले की एआय हे केवळ एक तंत्रज्ञान नाही तर भविष्य घडवणारी एक शक्ती आहे. विद्यार्थ्यांसाठी एआय समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. त्यानंतर पाहुण्यांना व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आले, ज्यात विकासा अकोलाचे अध्यक्ष सीए प्रतीक मंत्री, सीए असो. अकोलाचे कोषाध्यक्ष केवर कोषाध्यक्ष माहिर गुरनानी यांचा समावेश होता.

### कपास किसान ॲपवर सकाळी १० पासून स्लॉट बुकींग

**अकोला :** भारतीय कपास महामंडळाने कपास किसान मोबाईल ॲप सुरू केले आहे. या ॲपवर अकोला आणि औरंगाबाद शाखेसाठी स्लॉट बुकींग सुरू करण्यात आली आहे. ही स्लॉट बुकींग सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. कापूस किसान मोबाईल ॲपद्वारे नोंदणी आणि स्लॉट बुकींग प्रक्रियेस मदत करण्यासाठी लिंक तयार करण्यात आली आहे. यात ॲपमध्ये नोंदणी व स्लॉट बुकींगसाठी सविस्तर माहिती व पायऱ्या दिलेल्या आहेत. स्लॉट बुकींग प्रक्रीयेत स्लॉट बुकींग सुविधा ७ दिवसाच्या रोलिंग बेसिसवर खुली राहील. प्रत्येक दिवशी एक तारीख बंद होईल व दुसऱ्या दिवशी नवीन तारीख खुली केली जाणार आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कपास किसान ॲपवर तातडीने नोंदणी करावी. तसेच सीसीआयच्या खरेदी केंद्रावर कापूस विक्रीस येण्यापूर्वी स्लॉट बुकींग करावी.

# शिवर येथे आज हभप तेजराव महाराज पिसे यांचे कीर्तन

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

विश्वमाऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवनी सोहळ्यानिमित्त शिवर येथे भक्तीमय वातावरण रंगणार आहे. श्री गणपती मंदिर, शरद नगर शिवर येथे जेष्ठ हरीकीर्तनकार हभप तेजराव महाराज पिसे यांच्या हरीकीर्तनाचे आयोजन २१ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८ ते १० या वेळेत करण्यात आले आहे. ज्ञानेश्वरी परंपरेचा जाज्वल्य प्रसार करत भाविकांच्या मनाला आध्यात्मिक स्पर्श देणारे हभप तेजराव महाराज पिसे यांचे कीर्तन हे नेहमीच भक्ती, ज्ञान आणि प्रेरणेची पर्वणी मानले जाते. त्यामुळे शिवर परिसरातील भाविकांमध्ये या कार्यक्रमाबद्दल उत्सुकता वाढली आहे. कार्यक्रमाचे आयोजन श्री ज्ञानेश्वर महाराज पारायण सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले असून, या भक्तिमय कीर्तनाचा लाभ जास्तीत जास्त भाविकांनी घ्यावा, असे आवाहन समिती सदस्य तसेच गावकरी मंडळींकडून करण्यात आले आहे. या संदर्भातील माहिती हभप पुरुषोत्तम महाजन पिसे यांनी दिली आहे. ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचे औचित्य साधून होणारे हे कीर्तन शिवर परिसरात भक्तिमय स्पंदने निर्माण करेल.

# कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीनचे दर गडगडले!

## ६,००० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्याची मागणी

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

किमान आधारभूत किंमतीपेक्षा किती तरी कमी भावात सोयाबीनची खरेदी सुरु आहे. कधी ओलावा तर कधी लहान दाणे मोठे दाणे या विषयावर भाव देण्यास टाळाटाळ केली जात आहे. यात सर्वाधिक फटका हा अकोल्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. पण, शेतकऱ्यांसाठी कोणी आवाज उठविणारे कोणी नसल्याचे चित्र आहे.

अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात सोयाबीनची आवक होत आहे. मात्र, सोयाबीनला मिळत असलेला केवळ ३,५०० ते ४,००० रुपये प्रति क्विंटलचा भाव यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भरून काढणे कठीण झाल्यामुळे ते आर्थिक संकटात सापडले आहेत. आता, जेव्हा शेतकरी मोठ्या कष्टाने वाचलेला आपला माल विक्रीसाठी



कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आणत आहेत, तेव्हा त्यांना कमी दरात सोयाबीन विकावे लागत आहे. सरकारने निश्चित केलेली किमान आधारभूत किंमत मिळत नसल्याने शेतकरी तीव्र असंतोष व्यक्त करत आहेत. आतापर्यंत अकोला बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांकडून एक लाख क्विंटलपेक्षा अधिक सोयाबीनची खरेदी झाली आहे. तरीही, कमी किमतीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. सध्या सोयाबीनला मिळत असलेला ३,५०० ते ४,००० रुपये प्रति क्विंटलचा भाव हा किमान आधारभूत किमतीच्या खाली आहे. शासनाने घोषित केलेल्या एम एस पी पेक्षा कमी दराने कृषी उत्पन्न बाजार समितीत खरेदी कशी होऊ शकते, असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.

# थकित करापोटी पश्चिम झोन येथील मालमत्तावर सीलची कारवाई

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.आयुक्त गजानन घोंगे यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम झोन अंतर्गत रामपीर नगर, खैर मोहम्मद प्लॉट येथील वार्ड क्रं. बी -१० मालमत्ता क्रं. ७०३, शेख चांद शेख इब्राहिम यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये २,४४,३२६/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या मलमत्तावर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत सहा.कर अधिक्षक राजेश जाधव, कर वसुली लिपिक इकबाल हुसैन, प्रकाश मालगे, सै.अजहर आदींची उपस्थिती होती.अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील, जप्ती व लीलाव सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

# मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी अकोला पोलीस दल सज्ज!

## पोलीस अधीक्षक अकोला यांनी ग्राम हिवरखेड येथे स्ट्रॉग रुम सुरक्षा बाबत पाहणी केली

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

सध्या अकोला जिल्हयामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक (नगर पंचायत व नगरपरिषद) निवडणुक २०२५ ची प्रकीया तालु आहे. निवडणुक प्रक्रिया दरम्यान आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. दिनांक ०१.१२.२०२५ रोजी मतदान होणार आहेत. दिनांक ०२.१२.२०२५ रोली मतमोजनी असणार आहे. निवडणूक अनुषंगाने जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रिया भयमुक्त वातावरणामध्ये पार पाडण्याकरिता श्री. अर्चित चांडक पोलीस अधीक्षक, अकोला यांचे मार्गदर्शना खाली अकोला पोलीस दल सज्ज झाले आहे.

अकोट, तेल्हारा, हिवरखेड, बाळापूर, मूर्तिजापूर, बार्शीटाकळी, या गावात मतदान होणार असुन बंदोबस्त तैनात केला जाणार असुन बूथ बंदोबस्त, मतदान केंद्र बंदोबस्त, मतदान केंद्रा बाहेर १०० मीटर बंदोबस्त, वाहन पेट्रोलिंग, अशी विभागणी



केली आहे, संवेदनशील भागात जास्त बंदोबस्त पोलीस स्टेशन स्तरावर लावण्यात आला आहे.आज दिनांक १९.११.२०२५ रोजी श्री अचिंत चांडक पोलीस अधीक्षक अकोला यांनी ग्राम हिवरखेड येथे मतमोजनी केंद्राचे स्ट्राँग रूम सुरक्षा बाबत पाहणी केली.स्ट्राँग रूमच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाच्या सूचनां व मार्गदर्शन तैनात पोलीस अधिकारी व अंमलदारांना केले. प्रवेश-निर्गमन नियंत्रण, सीसीटीव्ही कव्हरेज, २४ तास पहारा, ड्युटी रजिस्टर, स्ट्रॉग रूमच्या बाहेरील सुरक्षा घेर्याची तपासणी याबाबत विशेष निर्देश दिले.तसेच एस.एस.टी. (Static Surveillance Team) पथकाची तपासणी करून त्यांना निगराणी, वाहन तपासणी, संशयितांवर सतर्क नजर, निवडणूक साहित्य वाहतूक सुरक्षा इत्यादींबाबत आवश्यक सूचना दिल्या.

## NULM-DJAYS अभियानात बचत गटातील महिलांचा निर्धार

# शंभर टक्के मतदान आमचं कर्तव्य!




■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

मुर्तिजापूर नगर परिषदेच्या छणङच ञाअधड अभियानांतर्गत बचत गटातील महिलांनी आज प्रभावी मतदान जनजागृती राबवत ङ्ग१०० टक्के मतदान करूचङ्ख असा संकल्प पत्र मा. निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार यांच्या निवेदनार्थ सादर केले.या उपक्रमात महिलांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मतदानाचे महत्त्व पोहोचवण्याचा संकल्प केला. गटातील महिलांनी घरोघर जाऊन मतदारांना जागरूक करण्यासाठी मोहिम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.संकल्पपत्र देताना महिलांनी सांगितले की, ङ्गलोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने मतदान करणे आवश्यक आहे. आम्हीच नव्हे, तर आमच्या परिसरातील सर्वांना मतदानासाठी प्रोत्साहित करू.निवडणूक प्रशासनाकडूनही या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले असून मुर्तिजापूर शहरात महिला शक्तीने उभारलेला हा आदर्श उपक्रम मतदान टक्केवारी वाढविण्यास हातभार लावणार आहे.

# पिकविमा तक्रारी रखडल्याने आत्मदहनाचा इशारा! प्रशासनात साठेलोटे

## कृषी विभागाचे आश्वासन फोल; जिल्हाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शेतकरी टोकाला - २७ ऑक्टोबरला आत्मदहनाचा इशारा



■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकविमा तक्रारींचे निराकरण महिनोनमहिने रखडत असल्याने शेतकरी संघटनांचा संताप शिगेला पोहोचला आहे. १५ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा कृषी अधीक्षकांनी तक्रार निवारणाचे लेखी आश्वासन देऊनही पुढील कोणतीही कार्यवाही न झाल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर २९ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन दिले, तरीही निष्क्रियता कायम असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे.यामुळे कृषी विभाग व विमा कंपनीमध्ये साठेलोटे असल्याचा संशय शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे. प्रशासनाने सात दिवसात ठोस निर्णय न घेतल्यास २७ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन, असा तीव्र इशारा जिल्हा संघटक राहुल वानखडे, जिल्हा उपाध्यक्ष सै. रियाज, ज्येष्ठ कार्यकर्ते रामदास भगत यांनी दिला आहे.

# अकोला गुजराती समाजाच्या वतीने महानगरात आता आयटीआयच्या तांत्रिक शिक्षणाची सोय

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

सन १९६७ पासून महानगराच्या शैक्षणिक विश्वात जीएस कॉन्व्हेंट, एल डी पटेल हायस्कूल तथा मेहरबानो विज्ञान महाविद्यालय सारखे शैक्षणिक उपक्रम संचालित करणाऱ्या व अनेक सांस्कृतिक उपक्रम साकारणाऱ्या श्री अकोला गुजराती समाजाच्या वतीने ग्रामीण व शहरी भागाच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान उपलब्ध होऊन केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत, स्किल इंडिया सारख्या उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना त्वरित रोजगार उपलब्ध व्हावा. यासाठी महानगरात कसबी तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या इंडस्ट्रियल टेक्निकल इन्स्टिट्यूट अर्थात आयटीआयची मुहूर्तमेढ रोवल्या जात असून अकोल्याच्या शैक्षणिक विश्वात ही मोठी उपलब्धी असल्याची माहिती श्री अकोला गुजराती समाजाचे अध्यक्ष दिपेन शाह यांनी दिली. गुरुवारी मेहरबानू विज्ञान महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विजय जानी, प्रवीण पटेल, सचिव नरेंद्र पटेल, कनुभाई सायानी, महेंद्र देडिया, कोषाध्यक्ष कनकभाई शाह, रवीभाई पटेल आदी उपस्थित होते. गत तीस वर्षापासून संस्थेचे शैक्षणिक चेअरमन असणारे दानदाते स्व. सुरेशभाई देवकरण शाह यांच्या स्मृतीत त्यांच्या नावाच्या



आध्याक्षराने ‘डेक्सन आयटीआय विद्यालय येथून जवळच असणाऱ्या बाभुळगाव येथे निर्माण करण्यात आले आहे. या आयटीआय विद्यालयाचा उद्घाटन सोहळा बाभूळगाव येथे रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सर्वप्रथम डेक्सन आयटीआय विद्यालयास आर्थिक सहकार्य करणारे स्व सुरेशभाई देवकरण शाह यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा श्रीमती जयश्रीबेन सुरेशभाई शाह व कुटुंबाच्या उपस्थितीत होणार आहे. यानंतर 'सोनल अँड व्रज लाठीया आयटीआय वर्कशॉप' दालनाचे उद्घाटन अमेरिका येथील दानदाते व्रजभाई अभेचंद लाठीया यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत या शैक्षणिक उपक्रमासाठी आर्थिक सहकार्य करणाऱ्या दानदात्यांचा सन्मान सोहळा ही आयोजित करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बाभुळगाव रस्त्यावरील शिवाजी इंजीनियरिंग अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या जवळ असणारे हे आयटीआय विद्यालय सहा एकराच्या विशाल कॅम्प मध्ये थाटण्यात आले असून वीस हजार स्केअर फुटाची प्रशस्त इमारत आधुनिक उपकरण व सुविधेने आयटीआय विद्यार्थ्यांसाठी स्थापित करण्यात आली आहे. या शैक्षणिक सत्रापासून या आयटीआय विद्यालयात चार उपयुक्त कोर्सेस विद्यार्थ्यांना तज्ञ शिक्षका कडून शिकविले जाणार आहेत. यामध्ये आठवी पास असलेल्यांना वेल्डर हा कोर्स तर दहावी पास असलेल्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असा सोलर टेक्निशियन, इलेक्ट्रिशियन व कॉम्प्युटर ऑपरेशन टेक्निशियन हे एक वर्षाच्या मुदतीचे कोर्स शिकविण्यात येणार आहेत.

महासागर
•शुक्रवार,दि.२१ नोव्हेंबर २०२५
अकोला
पान ६

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचे काम सुरळीत

## नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया लवकरच सुरु होणार

▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र (ङजख) देण्या व्यतिरिक्त उर्वरीत कामकाज सुरळीत सुरू असून, लाभार्थ्यांना दिला जाणारा व्याज परतावा कोणत्याही अडथळ्याविना नियमितपणे वितरित केला जात असल्याची अधिकृत माहिती महामंडळाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

सप्टेंबर, २०२५ अखेर होल्ड केलेली व स्थगित (ब्लॉक) केलेली प्रकरणे वगळता व्याज परताव्यासाठी दावा केलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात व्याज परताव्याची रक्कम जमा करण्यात आली आहे.काही माध्यमांमध्ये महामंडळाचे कामकाज बंद असल्याच्या प्रसारित झालेल्या बातम्यांवर महामंडळाने स्पष्टीकरण दिले आहे. पात्रता प्रमाणपत्र संबंधीची प्रक्रिया काही तांत्रिक कारणांमुळे तात्पुरती स्थगित करण्यात आली होती, मात्र व्याज परतावा व बँक मंजुरी प्रकरणांचे कामकाज सुरळीत सुरू आहे.

**अहिल्यानगर येथील गैरप्रकारांबाबत गुन्हा दाखल !**

नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील काही एजंट आणि ट्रॅक्टर एजन्सी यांनी संगनमत करून,एकाच मोबाईल क्रमांक वापरुन अनेक प्रकरणे महामंडळाकडे दाखल केली होती. त्यातील




**गैरव्यवहार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई**

काही व्याज परताव्याचे पैसे एजंटने स्वत:च्या खात्यावर घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे. या माहितीची दखल घेत, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. विजयसिंह देशमुख यांनी अहिल्यानगरच्या पोलिस अधीक्षकांना त्वरित कारवाईसाठी पत्र दिले.

या अनुषंगाने पोलिस अधिक्षक, अहिल्यानगर यांनी तातडीने प्रकरणाची दखल घेत तोफखाना पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे संबंधितांवर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. नाशिक व अहिल्यानगर या दोन्ही जिल्ह्यांमध्ये अनियमिततेबाबत गुन्हे दाखल झाले असून, या प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती महामंडळाने दिली आहे. अशा घटना राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये देखील एजंटमार्फत किंवा इतर यंत्रणांमार्फत घडल्या आहेत का, याची तपासणीदेखील महामंडळ करीत आहे. नाशिक व अहिल्यानगर येथे घडलेल्या गैरव्यवहारासारखी प्रकरणे अन्य ठिकाणी घडू नये यासाठी अलर्लीपीं तरश्रळवरींळेप प्रणाली लागु करण्यात येत आहे.

एजंटमार्फत दाखल केलेली अशी प्रकरणे महामंडळाने तात्पुरत्या स्वरुपात इश्रेलज्ञ केली आहेत. ज्या लाभार्थ्यांची प्रकरणे इश्रेलज्ञ केली आहेत अशा लाभार्थ्यांनी त्यांच्या मुळ कागदपत्रांसह आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा समन्वयक यांना संपर्क करावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क क्रमांक www.udyog.mahaswayam.gov.in प्रणालीवर उपलब्ध आहे. यापुढे नागरी सुविधा केंद्र वगळता, अन्य प्रकरणी एकच मोबाईल क्रमांक/ लॉगीन करुन एकच प्रकरण दाखल करता येईल, अशी सुधारणा महामंडळाने प्रस्तावित केली आहे.

पात्रता प्रमाणपत्र (LOI) च्या प्रक्रीयेमध्ये तांत्रिक सुधारणा पुर्ण करुन, शक्य तेवढ्या लवकर नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) सुरु करणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक यांनी दिली.

## शेतीच्या वादातून मारहाण

▪तेल्हारा,दि २० (प्रतिनिधी) :

तेल्हारा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या खेलमुकर्दम (पंचगव्हाण) शेतशिवारात सोमवारी १७नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते ९.३० वाजे दरम्यान फिर्यादी खॉ जैनुल्ला खाँ (३०) रा. खेलकृष्णाजी ता. तेल्हारा जि. अकोला हा शेतात काम करण्यास गेला असता आरोपी आसिफ खाँ उर्फ कुदरतखाँ (३४) रा. खेल मुकदम ता. तेल्हारा जि. अकोला हा फिर्यादीस 'माझे शेतातून तू जाणे येणे का करतो? असे म्हणून त्याने अशोभनीय शिवीगाळ केली. तेरे बारे मे चोरी का रिपोर्ट देता' असे म्हणून थापड मारली. फिर्यादी एकटा असल्याने घरी गेला तेव्हा आरोपी आसिफ खाँ उर्फ कुदरत खाँ, सादिक खाँ कुदरत खाँ व कुदरत खाँ इब्राइम खॉसर्व रा. खेल मुकर्दम ता. तेल्हारा जि. अकोला यांनी फिर्यादीचे लहान भावास काठीने मारहाण केली. अशा जवानीवरून पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## जागतिक शौचालय दिनानिमित्त विशेष मोहिम

▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने ङ्गहमारा शौचालय, हमारा भविष्यङ्ग*ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात जिल्यातील सर्व गावात वैयक्तिक व सार्वजनिक शौचालये दुरुस्ती व रंगरंगोटी करून वापरात आणण्यात येणार आहे . मानवी हक्क दिनापर्यंत म्हणजे १० डिसेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती या मोहिमेत सहभाग नोंदविणार आहेत. यामाध्यमातुन राबविण्यात येर्णाया उपक्रमात आरोग्य, शिक्षण, महिला व बाल कल्याण तसेच उमेद या विभागांनी सहभागी होण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत. , जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक मिलींद मोरे यांच्या नेतृत्वात ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. शौचालये ही केवळ सोयीची नव्हे तर आरोग्य, प्रतिष्ठा व सुरक्षिततेची हमी देणारी मूलभूत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावातील वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, देखभाल व सुशोभीकरणावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. अपूर्ण किंवा दुरुस्तीची गरज असलेली सार्वजनिक शौचालयांची नोंद घेऊन त्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कालावधीत शाळा, ग्रामसभा, स्वयंसहाय्य गट, युवक मंडळे, निवृत्त सैनिक, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग घेऊन स्वच्छता, आरोग्य, सुरक्षित मलनिस्सारण तसेच हवामान अनुकूल स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. ग्रामस्थांना त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची रंगरंगोटी, सुशोभीकरण आणि नियमित देखभाल करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

**▪२१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत गावागावांत मोहिमेचे विविध उपक्रम राबविण्यात येतील. उत्तम देखभाल व सुशोभीकरण करणाऱ्या वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालये यांचा अंतिम टप्प्यात विशेष गौरव करण्यात येणार आहे. १० डिसेंबर रोजी मोहिमेचा समारोप करून उत्कृष्ट शौचालय पुरस्कार जाहीर केले जातील. तरी या मोहिमेत सर्व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी केले आहे.**

## कंटेनर चालकाच्या निष्काळजीपणामुळे शेलू-वेताळ रस्त्याच्या कमानीचे सात लाखांचे नुकसान

▪मुर्तिजापुर,दि २० (प्रतिनिधी) :

तालुक्यातील शेलूवेताळकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ग्राम सोनारी समोर कंटेनरची जोरदार धडक बसून रस्त्यावरील कमानीचे मोठे नुकसान झाले. गुरुवारी (२० नोव्हेंबर २०२५) सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडलेल्या या अपघातात कमानीचा वरचा भाग कोसळून अंदाजे सात लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.फिर्यादी राजु वासुदेवराव सदार (वय ४३, रा. शेलूवेताळ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कंटेनर क्रमांक छड ०२ अअ ०५२४ चा चालक अत्यंत निष्काळजीपणे वाहन चालवत होता. ट्रकवरील मालाची उंची लक्षात न घेता चालकाने कमानीखाली




वाहन घातल्यामुळे मालाचा वरचा भाग थेट कमानीला धडकला. धडकेचा आवाज मोठा असल्याने परिसरातील नागरिक काही काळ घबराटीत आले.घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी तसेच कउ प्रभाकर नागे, कउ विनोद कुंभरे, कउ सचिन वैराळे आणि झउ नामदेव आडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी प्राथमिक तपास व पंचनामा करून कंटेनरला रस्त्याच्या बाजूला हलवले आणि वाहतूक सुरळीत करण्याची तत्पर व्यवस्था केली.या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या कमानीचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.फिर्यादीच्या तक्रारीवरून पोस्ट मुर्तीजापूर शहर पोलीस ठाण्यात अप क्र. ५०३/२५ अन्वये भा. न्या. संहिता २०२३ कलम २८१, ३२४(५) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## निवडणुक निरीक्षकांकडून हिवरखेड येथे पाहणी

▪हिवरखेड,दि २० (प्रतिनिधी) :

बुलढाणा येथील अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांची हिवरखेड नगरपरिषद निवडणुकी साठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे . नियुक्तीनंतर निवडणूक निरीक्षकांनी हिवरखेड नगरपरिषद सार्वत्रीक निवडणुकीसाठी दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रांच्या छाननी प्रक्रीयेचे निरीक्षण केले . त्यानंतर शहरातील सर्व मतदान केंद्राची प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली . मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक सर्व सुविधा मतदान केंद्रावर उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना दिले . तसेच निवडणुकी करीता तयार करण्यात येणाऱ्या मतदान यंत्र साठवणुकीसाठी नियुक्त सुरक्षित कक्षाचीही निरीक्षकानी पाहणी केली . सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन , प्रवेश नियंत्रण आणि इतर आवश्यक बाबींची त्यांनी तपासणी करून मार्गदर्शन केले . या पाहणी दरम्यान निवडणुक निर्णय अधिकारी परशराम भोसले, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी दादाराव डोल्हारकर व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते .




## मुर्तिजापूर नगर परिषद निवडणुकीत माघारीची मोठी हालचाल-अंतिम दिवसावर सर्वांचे लक्ष

▪मुर्तिजापुर,दि २० (प्रतिनिधी) :

नगर परिषद मुर्तिजापूर सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये उमेदवारी मागे घेण्याची अंतिम वेळ २१ नोव्हेंबर दुपारी ३ वाजता संपणार असून, त्याआधीच शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. १९ व २० नोव्हेंबर रोजी मिळून एकूण ११ उमेदवारांनी माघार घेतली आहे, तर आज शेवटच्या दिवशी आणखी किती जण स्पर्धेबाहेर जातात याकडे उत्सुकता वाढली आहे. विशेष म्हणजे माघार घेतलेल्या उमेदवारांमध्ये प्रभाग १-अ, ५-ब, २-व, ७-अ, ३-अ, ९-अ, २-ब, ७-अ आणि ९-ब या प्रभागांतील उमेदवारांचा समावेश आहे. यामुळे या सर्व प्रभागांमध्ये निवडणुकीचे समीकरण मोठ्या प्रमाणात बदलले असून लढत सरळ होत चालली आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोन्हीकडील पॅनेल राजकारणामुळे काही उमेदवारांनी दबावाखाली माघार घेतल्याची चर्चा देखील सुरू आहे.एकूण १८९ नामनिर्देशन अर्जांपैकी (नगराध्यक्ष - ११,



नगरसेवक - १७८) आतापर्यंत ११ उमेदवारांनी मागे घेतल्याने अंतिम यादी जाहीर होण्यापूर्वी अनेक बदल घडत आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांच्या कार्यालयात आज सकाळपासूनच वातावरण तापले असून उमेदवार, कार्यकर्ते आणि समर्थकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.अंतिम माघारीची मुदत संपल्यानंतर संध्याकाळी अंतिम यादी जाहीर होणार असून त्यानंतर मुर्तिजापूरमधील निवडणुकीचा अंतिम मुकाबला अधिक स्पष्ट होणार आहे.

## थोडक्यात

### यावलखेड गावात शेतकऱ्यांसाठी 'डोळा कलम प्रात्यक्षिक

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कार्यरत कृषी महावि द्यालय, अकोला येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम (RAWE) अंतर्गत यावलखेड गावात शेतकऱ्यांसाठी 'डोळा कलम (Grafting) व डोळा भरणे (Budding)' या आधुनिक अभिवृद्धी तंत्रज्ञानावर आधारित प्रात्यक्षिक सादर केले. या उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना फळझाडांच्या सुधारित जातीची अभिवृद्धी करण्याच्या पद्धतींचे प्रत्यक्ष ज्ञान देणे आणि पारंपरिक शेतीत नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यास प्रवृत्त करणे हा होता.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी कलम तंत्रज्ञानाचे सैद्धांतिक स्पष्टीकरण देऊन केली. त्यांनी फळझाडांच्या वेगवेगळ्या जातींचे मिश्रण करून गुणवत्तापूर्ण उत्पादन कसे मिळवता येते, यावर प्रकाश टाकला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतात डोळा कलम आणि डोळा भरणे या प्रक्रियेचे सविस्तर प्रात्यक्षिक दाखवले.प्रात्यक्षिकादरम्यान विद्यार्थ्यांनी लिंबू, संत्रा, डाळिंब यांसारख्या प्रमुख फळिपकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कलम पद्धतींचे नमुने तयार केले. त्यांनी शेतकऱ्यांना कलमासाठी आवश्यक साहित्य जसे की बडिंग नाईफ, टेप, खुंट यांचा उपयोग, काळजी घेण्याच्या पद्धती, तसेच यशस्वी कलमासाठी लागणाऱ्या हवामानाच्या अटी याचेही स्पष्टीकरण दिले.विद्यार्थ्यांनी डोळा कलम आणि डोळा भरणे तंत्रज्ञानातील फरक, तसेच कलमानंतर होणारी वाढ, पाणी व्यवस्थापन आणि रोग नियंत्रण उपाययोजना याविषयीही शेतकऱ्यांशी संवाद साधला.हा उपक्रम कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, उद्यानविद्या शाखाप्रमुख डॉ. सुधीर दलाल, तसेच सहायक प्राध्यापक डॉ. अतुल वराडे, डॉ. योगिता सानप, डॉ. प्रविणा सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.प्रात्यक्षिकात विद्यार्थिनी चैतन्या निकम, त्रिवेणी मडावी, रेणुका लोडाम, ऋतुजा खंडारे, कल्याणी कुरुवाडे, प्रणवी महल्ले, आचल तुळस्कर, प्रेरणा पारधी, सानिया मोकासे आणि विद्यार्थी साहिल वाघमारे, हर्षल विल्हेकर, अनिकेत पालवे यांनी सक्रिय सहभाग घेतला.विद्यार्थ्यांनी आपापसांत कार्यविभाजन करून प्रात्यक्षिक सादरीकरण, साहित्य तयारी, शेतकरी संवाद व प्रत्यक्ष कलम प्रक्रिया अशा जबाबदाऱ्या पार पाडल्या.

### विद्यार्थ्यांची 'इस्त्रो' अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**अकोला:** जळगावच्या नोबल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये प्रभात किड्स स्कूलच्या ९ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले असून त्यांची एनएसटीएस तर्फे इस्त्रोच्या अभ्यास दौयासाठी निवड झाली आहे.'इस्त्रो' अभ्यासदौयासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आराध्या राठी, रेयांश बोबडे, अर्णवी ढोरे, प्रांशू देशमुख, स्पंदन वानखडे (सर्व इयत्ता ६ वी); रणविरसिंग राजपूत, आराध्य रानडे, शर्वरी लहरिया (सर्व इयत्ता ७ वी) आणि यश महाजन (इयत्ता ९ वी) यांना संधी प्राप्त झाली आहे.'इस्त्रो' मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रभातच्या स्पर्धा परीक्षा विभागाच्या प्रमुख व्हि. अनुराधा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. मिता इंगळे व विज्ञान शिक्षक वृंद यांनी सातत्यशील मार्गदर्शन केले.'प्रभात' मधील विद्यार्थ्यांची 'इस्त्रो' या शैक्षणिक अभ्यास दौयासाठी गुणवत्तापूर्ण निवड झाल्याबद्दल प्रभातचे संस्थापक संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, प्राचार्य सौ. वृषाली वाघमारे, उपप्राचार्य सौ. अर्चना बेलसरे, सिनिअर को-ऑर्डीनेटर मो. आसिफ, सीबीएसई को-ऑर्डीनेटर प्रशांत होळकर यांनी कौतुक केले आहे.

## प्रगती झुनझुनवाला सीए परीक्षा उत्तीर्ण

▪तेल्हारा,दि २० (प्रतिनिधी) :

स्थानिक सेठ बन्सीधर दहिगावकर हायस्कूल एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान संचालक ओमप्रकाश झुनझुनवाला यांची कन्या कु. प्रगती ओमप्रकाश झुनझुनवाला हिने नुकतेच जिद्द, चिकाटी व अथक परिश्रमाच्या बळावर प्रतिष्ठेची समजली जाणारी सिए ची (चार्टर्ड अकाउंटंट) परीक्षा समाधानकारक गुणांनी उत्तीर्ण केली आहे. कु. प्रगती झुनझुनवाला ही मूळची तेल्हारा तालुक्यातील माळेगाव बाजार येथील रहिवाशी आहे.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My HUSBAND Passport No is :- **(H8098482)**
---------From----------
**SAROJ DEVI**
---------TO--------------
**SAROJ DINESH JANGID**
My Residential Address is :- Ganraj Residency No 2 VHB Colony Near Water Tank Malkapur Akola 444001

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport :- **(H8098482)**
---------From----------
**DINESH KUMAR JANGIR**
---------TO--------------
**DINESH KUMAR KAILASHCHAND JANGID**
My Residential Address is :- Ganraj Residency No 2 VHB Colony Near Water Tank Malkapur Akola 444001

## अकोट तालुक्यातील शेतकऱ्यांची ब्रश कटर यंत्र आणि पावर विडर कम इंटर कल्टीवेटर यंत्रासाठी निवड

▪अकोट,दि २० (प्रतिनिधी) :

जिल्हा परिषद उपकर योजना सन २०२५- २६ अंतर्गत ९० टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना ब्रश कटर यंत्र पुरविणे या योजनेतील पंचायत समिती अकोट मधील सर्वसाधारण गटातील यापूर्वी निवड झालेल्या पात्र यादी मधील व प्रतीक्षा यादी मधील तसेच पावर विडर कम इंटर कल्टीवेटर यंत्र पुरविणे योजनेचे दिव्यांग प्रवर्गातील निवड झालेल्या पात्र यादी मधील व प्रतीक्षा यादी मधील लाभार्थी संपुष्टात आल्याने उर्वरित शिल्लक यादी मधील लाभार्थीची नव्याने निवड करण्यासाठी आज दिनांक २०- ११- २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता मा. अतिरिक्त मुख्य



कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांचे अध्यक्षतेखाली सोडती द्वारे निवड प्रक्रिया घेण्यात आली.

यामध्ये ब्रश कटर यंत्र पुरविणे सर्वसाधारण प्रवर्गातील उर्वरित ३२ लाभार्थी पैकी लक्षांकानुसार ४ लाभार्थीची पात्र लाभार्थी म्हणून निवड करण्यात आलेली असून उर्वरित २८ लाभार्थीची प्रतीक्षा यादीवर निवड करण्यात आलेली आहे. तसेच पावर विडर कम इंटर कल्टीवेटर यंत्रासाठी दिव्यांग प्रवर्गातील उर्वरित २ लाभार्थी पैकी एका लाभार्थीची पात्र लाभार्थी म्हणून व एका लाभार्थीची प्रतीक्षा यादीवर निवड करण्यात आलेली आहे. सदर निवड प्रक्रियेसाठी मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला , मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अकोला, मा. कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद अकोला, मा. गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोट, मा.जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) जिल्हा परिषद अकोला, कृषी अधिकारी पंचायत समिती अकोट, विस्तार अधिकारी ( कृषी) पंचायत समिती अकोट व जिल्हा परिषद कृषी विभागामधील इतर अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

## गायगाव येथील वरली अड्डयावर धाड

**अकोला :** उरळ पोलिस स्टेशनांतर्गत येणाऱ्या गायगाव येथील वरली अड्डयावर बुधवार, १९ नोव्हेंबर रोजी दुपारी धाड टाकून वरलीच्या चिठ्ठयास १८१० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच रमेश वाकोडे याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार उरळ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गायगाव येथे एक इसम वरलीचे आकडे लिहित असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पंचासमक्ष घटनास्थळी धाड टाकली असता रमेश श्रीधर वाकोडे (३९) याला १ ते १० आकडे लिहिलेला टाईम क्लोज वरलीच्या दहा चिठ्ठया, नगदी १८१० रुपये व इतर मुद्देमाल मिळून आला. या प्रकरणी हेकॉ भाऊराव मोहोड यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध कलम १२ जुगार कायद्यानुसार उरळ पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अक्षीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली उरळ ठाणेदार पंकज कांबळे, हेकॉ मोहाडे, हवालदार नेमाडे, शिपाई वानखेडे व वाकोडे यांनी केली आहे.

## भोलेराम की सेनाच्या वतीने शनिवारी शंभरावा विक्रमी हनुमान चालीसा पाठ

▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

दर शनिवारी महानगरातील विविध मंदिरे,धार्मिक स्थळे येथे प्रभू रामचंद्राच्या कृपेने सामूहिक संगीतमय श्री हनुमान चालीसा पाठ करणाऱ्या महानगरातील युवकांच्या भोलेराम की सेना या युवाशक्तीच्या वतीने नुकतेच ९९ सामूहिक हनुमान चालीसा पाठ संपन्न झाले असून आता शंभरावा विक्रमी सामूहिक हनुमान चालीसा पाठ आयोजित करण्यात आला आहे. शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी गोरक्षण रोड येथील कुणबी समाज मंगल कार्यालय समोरील हनुमान मंदिरात हा विक्रमी शतकीय संगीतमय हनुमान चालीसा सोहळा होणार आहे.या सोहळ्यात प्रथम साय ६ वाजता पु शास्त्री जनक जोशी हे महानगरात प्रथमच संगीतमय हनुमान चालीसा कथा सादर करणार आहेत.यानंतर रात्री ८-३० वाजता भोलेराम की सेनाच्या युवकांच्या वतीने शंभरावा हनुमान चालीसा पाठ सादर करण्यात येणार आहे. महाआरती ने या उत्सवाचे समापन करण्यात येणार आहे.या विक्रमी उत्सवाची तयारी भोले राम की सेनाच्या युवकां च्या वतीने करण्यात आली असून प्रथमच होत असणाऱ्या पू शास्त्री जनक जोशी यांच्या हनुमान कथा व युवकांच्या सामूहिक संगीतमय हनुमान चालीसा पठण कार्यक्रमात पुरुषशक्ती व मातृशक्तीने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भोले राम की सेनाच्या समस्त सेवाधाऱ्यानी केले.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, १मला स्क्रेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

बिहारच्या निवडणुकीत मोठा चमत्कार घडवून भाजपला दणका बसणार असे भाकीत एका बाजूला वर्तविले जात होते. तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रात लाडक्या बहिणी अवघ्या दीड हजारात भाजपच्या बाजूला गेल्यामुळे बिहारमध्ये तर तोच प्रयोग सुरू असल्याने वेगळा निर्णय काय लागणार? असेही बोलले जात होते. तसेच सलग वीस वर्षे सत्तेत असलेल्या नितीशकुमार यांना अँटी इन्कमबन्सीचा फटका बसू शकतो, अशा चर्चा निवडणुकीआधी सुरू होत्या. मात्र, मागास, अतिमागास आणि महिला हे आपले हक्काचे मतदार आहेत, हे लक्षात घेऊन निवडणुकीआधी या घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे धोरण त्यांनी अवलंबले. त्याचबरोबर 'जंगलराज विरुद्ध विकासराज' हे नॅरेटिव्ह मतदारांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्नही त्यांच्या पथ्यावर पडल्याचे एकूणच निकालातून दिसते. त्यामुळेच आज पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची माळ नितीश बाबूंच्या गळ्यात पडली. जंगलराज विरुद्ध विकास, प्रकृतीस्वास्थ्य विरुद्ध तरुण नेता, अनुभव विरुद्ध घराणेशाही, रेवडीसंस्कृती विरुद्ध लोककल्याण अशा अनेक मुद्द्यांवरून तापलेल्या आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांना सातत्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याच्या प्रयत्नांना बिहार निवडणुकीच्या निकालातून खणखणीत उत्तर मिळाले आहे. लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांची लढाई यशस्वी होईल, असे त्यांच्या सभांवरून वाटत होते. त्यातच नितीशबाबू व तेजस्वी यांच्यातील वयातील अंतर पाहून जनता तरुण नेतृत्वाला संधी देईल, असेही म्हटले जात होते. पण घडले मात्र उलटेच. नितेश बाबूंच्या प्रकृतीस्वास्थ्य, क्षमतांबाबत वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांना त्यांनी चोख उत्तर देऊन टाकले. तेजस्वी यादव यांच्या पेक्षा नितीश कुमार दुप्पट वयाने मोठे आहे. ७४ वर्षीय नितीशकुमार यांच्यासमोर प्रमुख आव्हान म्हणून उभे ठाकलेले, तरुणांचे प्रतिनिधी अशी ओळख असलेले राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव यांचे लहान वय (३६) त्यांच्यासाठी जमेची बाजू होती. मात्र, बिहारमधील जनतेने तरुण नेतृत्वाऐवजी अनुभवाच्या पाठिशी भक्कम उभे राहून नितीश कुमार यांच्यावरच विश्वास दाखवत त्यांना सामनावीर ठरविले आहे. या निवडणूकीत अद्भूत निकाल समोर आला. सर्वच जण अचंबित झाले. या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीची त्सुनामी आली. त्यात महाआघाडीचा सुपडा साफ झाला. काँग्रेसची अवस्था तर विचारायची सोय राहिली नाही, अशी झाली. तेजस्वी यादव यांनी स्वप्न दाखवूनही तरुणांनी त्यांना काठावर पास केले. एमआयएमने जोरदार कामगिरी करून दाखवली. तर भाजप अपेक्षेप्रमाणे 'बिग ब्रदर' ठरला. इतक्या वर्षात दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकावरील भाजप यंदा पहिल्या क्रमांकवर आला. असे असूनही नितीश बाबूंचा आजपर्यंतचा 'सूर' पाहून भाजपने 'जरा दमाने' घेऊन त्यांनाच मुख्यमंत्री म्हणून स्वीकारले.




# बिहारमधील यशस्वी 'प्रॉडक्ट' नितीशबाबू!

गेल्या निवडणुकीनंतर त्यांनी घेतलेल्या वेगवेगळ्या भूमिकांमुळे त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह लागले होते. मात्र, तो शिक्का पुसून पुन्हा जनतेच्या मनात स्थान निर्माण करण्यात त्यांना यश आले. महाआघाडीमध्ये मित्रपक्ष आणि जागावाटपावरून गोंधळ सुरू असतानाच नितीश कुमार यांनी ठाम सूत्रे हातात ठेवत मित्रांपासून जागांपर्यंत सारे वेळेत निश्चित होईल, याची खबरदारी घेतली.

निवडणुकीपूर्वी मतदानातील कळीचे मुद्दे लक्षात घेत एनडीए सरकारने कल्याणकारी योजनांची मालिका जाहीर केली. योजनांमध्ये महिलांवर लक्ष केंद्रित करण्याचे धोरणही त्यांच्या अनुभवाची आणि धोरणीपणाची साक्ष देणारे ठरले. महिलांना थेट आर्थिक मदत, बचत गटांचे सक्षमीकरण, महिला शिक्षणाला बळ, सुरक्षेची हमी अशा अनेक आघाड्यांवरील योगदानामुळे महिला नितीश यांच्या मागे भक्कमपणे उभ्या राहिल्या.

निकालाचे चित्र स्पष्ट झाल्यावर जनता दल (संयुक्त) पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून नितीश कुमार हेच मुख्यमंत्री पदाचा चेहरा असल्याचे जाहीर केले होते. पण त्यानंतर भाजपच्या जागा वाढल्या आणि ही पोस्ट डिलिट करण्यात आली होती. त्यामुळे नितीश कुमार व पक्षाच्या मनात काय आहे हे पोटातील ओठांवर आले. पण गंमत आकड्यांची आहे.

एका मांडणीनुसार, नितीश कुमार यांना दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री व्हायचे आहे. त्यासाठी ते बिगर भाजपचे सरकार पण अस्तित्वात आणू शकतात. त्यासाठीची आकडेवारी त्यांच्या बाजूने असल्याची जमेची बाजू आहे. बिहार विधानसभेचे २४३ सदस्य आहेत. बहुमताचा आकडा १२२ इतका आहे. जेडीयूकडे ८५ जागा आहेत. त्यांना ३७ जागांची गरज आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

हा आकडा नितीशबाबू सहज जुळवू शकतात, याचा अंदाज भाजपला पुरेपूर होताच. भाजप नेत्यांनीच यापूर्वी नितीश कुमार यांना 'पलटूराम' म्हणून चिमटा काढला होता. त्यामुळे भाजप सरकारने मुख्यमंत्री पदासाठी नितीश कुमार यांचे नाव नाकारले आणि दोन्ही पक्षात तेढ निर्माण झाली, तर मग पुढे काय?

हाता तोंडाशी आलेली सत्ता गमवायची वेळ येऊ नये म्हणून अखेर भाजपने नितेश कुमार यांच्या मुख्यमंत्री पदाला होकार देऊन टाकला. त्याचे कारण स्पष्ट आहे की, जर नितीश कुमार यांनी विरोधकांना हाताशी धरून सरकार स्थापन्याचा प्रयत्न केला, तर काय करणार? यापूर्वीचे त्यांचे राजकारण विसरून चालणार नव्हते. त्यामुळे हा गट भाजपसोबत जाऊ शकतो.

त्यामुळे बिहारच्या सत्ता स्थापनेत जर तरच्या या गणितात शहाणपण कोण दाखवते याकडे सर्वांचं लक्ष लागले होते. भाजपने शहाणपण दाखवून नितीश बाबूंचा निर्णय घेऊन टाकला व पुन्हा एकदा त्यांच्याच हातात बिहारची सूत्रे देऊन टाकली.

बिहारमध्ये यंदा विक्रमी दोन टप्प्यांत सरासरी ६७ टक्के मतदान झाले. यात निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या सर्वेक्षणाचा कार्यक्रम राबवला त्यातून जवळपास ५० लाख मते वगळण्यात आली. त्यामुळे जरी ही सहा टक्के मतांची टक्केवारी कमी झाली तरी, ६२ टक्के मतदान हेदेखील मोठे ठरले. त्यातच यंदा हवामानाने साथ दिली.

दिवाळीनंतर छटपूजेच्या आसपास यावेळी मतदान होते. यासाठी स्थलांतरित मतदार मोठ्या संख्येने आपल्या गावी गेला होता. त्याला मतदानासाठी थांबवण्यात राजकीय पक्षांना यश मिळाले. वाढते मतदान सत्ताविरोधी मानले जाते. बिहारमध्ये मात्र हे मतदान सत्तेला अनुकूल ठरले. बिहारमध्ये दोन दशके २००५ पासून नितीशकुमार सत्तेत आहेत. तरीही त्यांच्या विरोधात संताप नव्हता. हे सारे घटक 'रालोआ'ला अनुकूल ठरले.

## दारुबंदीसारखे धोरण महिलांना आवडले

बिहार विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी काही महिने मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या प्रकृतीबाबत चर्चा सुरु होती. मात्र प्रचारात शंभरावर सभा घेत नितीशकुमार यांनी राज्याच्या राजकारणात आपल्याशिवाय विजयाचा लंबक दुसरीकडे जाऊ शकत नाही हे दाखवून दिले. त्यातूनच ह्यपच्चीस ते तीस, फीर एक बार नितीश' ही घोषणा त्यांच्या समर्थकांनी दिली. मतदारांनी संयुक्त जनता दल आणि भाजप यांच्या 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'ला अभूतपूर्व बहुमत दिले.

बिहारच्या निवडणूक रणांगणात एका बाजूला 'रालोआ' तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय जनता दल-काँग्रेस तसेच डावे पक्ष यांची 'महाआघाडी' असा सामना होता. मात्र निकाल पाहता हा सामना रंगलाच नाही. रालोआने २४३ पैकी दोनशेवर जागा घेत प्रचंड विजय मिळवला. यात सर्वच जात समुदायांनी साथ दिली असली तरी, विशेषतः महिला मतदारांचे प्रचंड मतदान विजयासाठी महत्त्वाचे ठरले. पुरुष मतदारांपेक्षा दहा टक्के अधिक मतदान यंदा महिलांचे होते. आकडेवारीच्या भाषेत राज्यभरात चार लाखांहून अधिक महिलांचे मतदान यंदा झाले. निकालातून त्यांचे अपेक्षित प्रत्यंतर उमटले. जिविका दीदीसारखी दहा हजार रुपये देणारी योजना महत्त्वाची ठरली. मतदानापूर्वी महिलांच्या खात्यात ही रक्कम जमा झाली. कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यावर नितीशकुमार यांच्याबाजूने महिलांनी वारंवार कौल दिला आहे. त्याला दारुबंदीसारखे धोरणही कारणीभूत ठरले. यातून महिलांविरुद्धच्या घरगुती हिंसाचारात घट झाली.

त्या तुलनेत घरटी एकाला सरकारी नोकरी देऊ हे राजदचे आश्वासन प्रभावी ठरले नाही. राज्यात यादव वगळता इतर मागासवर्गीय समाज तसेच तसेच त्यातील अतिमागास असा उपगट यांची संख्या जवळपास ३६ टक्के आहे. हा समाज सातत्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मागे उभा राहिला. तर १४ टक्के यादव व १७ टक्के मुस्लिम असा राष्ट्रीय जनता दलाचा भक्कम आधार मानला जातो.

मात्र त्यामध्येही फूट पडली. मोठ्या संख्यने मुस्लिम समाजाने नितीनकुमार यांना साथ दिल्याचे निकालातून दिसते. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम होऊन बिहारमध्ये सत्तांतर न घडता, आहे त्यांच्या हातातच सत्ता देण्याचे धोरण जनतेने स्वीकारले!

## प्रशांत किशोर यांचा दारूण पराभव

राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या पक्षाने समाजमाध्यमाच्या मदतीने वातावरणनिर्मिती मोठ्या प्रमाणात केली होती. त्यांना एकही जागा मिळाली नाही. दोन टक्क्याच्या आसपास मते मिळाली. संयुक्त जनता दलाला २५ जागाही मिळणार नाहीत असे भाकित त्यांनी वर्तवले होते. तेही साफ चुकले. आता किशोर पुढील पाच वर्षे कितपत मेहनत घेतात, त्यावर पुढील चित्र अवलंबून आहे. त्या तुलनेत हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांच्या एआयएमआयएम पक्षाला पाच जागा मिळाल्या. त्यांना दोन टक्के मते पडली. मुस्लिमबहुल सीमांचल विभागात 'रालोआ'ला अनेक ठिकाणी चांगली मते मिळाली. एकूणच 'रालोआ'ने ५० टक्क्यांच्या आसपास मते मिळवत बिहारची निवडणूक एकतर्फी केली. त्याचे परिणाम देशाच्या राजकारणावर होतील. विशेषतः विरोधकांनी उपस्थित केलेल्या मतचोरीच्या मुद्द्याचे काय, होणार हे पाहावे लागेल. मात्र दोन दशके मुख्यमंत्रीपदावर राहूनही ७४ वर्षीय नितीशकुमार हे बिहारच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असल्याचे निकालाने दाखवून दिले. भाजपने संयुक्त जनता दलाचे नेते नितीशकुमार यांचे मोठेपण मान्य करत दुय्यम भूमिका घेतली. तसेच चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षाने २०२० मध्ये स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. यावेळी त्यांची सहा टक्के मते 'रालोआ'च्या मागे आली. या आघाडीत समन्वय उत्तम होता. उलट विरोधी महाआघाडीत अधिकृत जागा वाटप जाहीर करण्यास विलंब लागला. त्यात बारा जागांवर एकमेकांविरोधात उमेदवार उभे करण्यात आले. तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यासही विलंब लागला. परिणामी आघाडीत समन्वय राहिला नाही. निवडणूक निकालात हा फटका बसला. एकूण मतदारांमध्ये जवळपास २० टक्के दलित आहेत. त्यांची साथही राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळाली. याखेरीज खुल्या गटातील १५ टक्के समुदायाचा पाठिंबा रालोआला होता. तोही भक्कमपणे मागे राहिला. एकूणच सामाजिक समीकरणात 'रालोआ'ने सहज मात दिली. त्यामानाने विरोधकांचे आघाडी खूपच मागे पडली त्या सर्व राजकीय पक्षांनी आता आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे

## नितीशबाबूंना 'सुशासन बाबू' का म्हणतात?

गेल्या २० वर्षात दहाव्यांदा मुख्यमंत्री होत असलेल्या नितीश कुमार यांच्याबद्दल लोकांना आवडलेल्या त्यांच्या बद्दलच्या काही गोष्टी मांडणे गरजेचे आहे. नितीश कुमारांनी २० नोव्हेंबर २०२५ रोजी विक्रमी दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. या भव्य समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच अनेक एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. नितीश कुमार यांनी बिहार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग म्हणजेच सध्याचे एनआयटी पाटणा मधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग केले, पण त्यांनी कधीही इंजिनिअर म्हणून काम केले नाही. आपण सगळे आयआरसीटीसी पोर्टल किंवा अप्लिकेशन वापरतो.

रेल्वे मंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळातच आयआरसीटीसीची स्थापना आणि अनेक महत्त्वाचे रेल्वे सुधार झाले. जेपी आंदोलनातील सगळ्यात यशस्वी 'प्रॉडक्ट' म्हणजे नितीश कुमार! त्यांना प्रेमाने 'सुशासन बाबू' म्हणतात, कारण त्यांच्या प्रशासन काळात बिहारमधील कायदा-सुव्यवस्थेत मोठी सुधारणा झाली, जे जवळजवळ 'अशक्य' मानले जात होते. ते आजही अत्यंत साधे कपडे, घरचे साधे जेवण आणि कमी सुरक्षा ताफ्यात प्रवास करणारे मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात. नितीश कुमार हे इतिहास, प्रशासन आणि साहित्य यांचे प्रचंड वाचन करतात.

आजही ते किमान तासभर वाचन केल्याशिवाय झोपत नाहीत. नितीश कुमार यांना भेटलेल्या व्यक्तींची नावे, जागा आणि वर्षांपूर्वीच्या चर्चाही ते नेमक्या तपशीलासह लक्षात ठेवतात. त्यांच्या मंत्रिमंडळ बैठकीत वेळेवर येणे आणि मुद्देसूद चर्चा करणे अनिवार्य असते. अनावश्यक भाषण किंवा राजकारणाला त्यात स्थान नसते. कोणता निर्णय कधी घ्यायचा याचा अचूक टायमिंग सेन्स त्यांच्या राजकीय कारकिर्दीची खास ओळख आहे. नितीश कुमार यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत त्यांच्यावर सिद्ध होणे तर दूर, पण त्यांच्यावर आजपर्यंत भ्रष्टाचाराचा एकही आरोप पण झालेला नाही. अशा अनेक बाबींमुळे सुशांत सुशासन बाबतच्या हाती बिहारची सूत्रे जाऊन बसले सर्वात मागासलेले राज्य म्हणून बिहारची ओळख देशात आहे ती आता पूर्णपणे बदलून देण्याचा ध्यास नितेश बाबूंनी घेतलेला दिसतो.

---




# भंडारा जिल्हा ठरतोय पोलीस प्रशासनातील रोल मॉडेल

## एसपी हसन यांनी केला तंत्रज्ञानाचा वापर



: शब्दांकन :
रणजीत चंदेल
यवतमाळ
9422866931

एआय तंत्रज्ञानाचा वापर काय क्रांती घडवू शकतो, हे भंडाऱ्याचे पोलीस अधीक्षक नुरूल हसन यांनी दाखवून दिले. त्यांनी हा दृष्टिकोण पुढे ठेऊन, ह्या अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर आणि इतर ही विविध उपाययोजना करून जिल्हा पोलीस प्रशासनात बदल घडवून आणले. त्यामुळे तेथील पोलीस प्रशसन अत्यंत कार्यक्षम झाले असून, जनतेचाही त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. गुन्हेगारीत घट आणि योग्य समन्वयामुळे जनतेला पोलीस प्रशासन आपले वाटत आहे.

**सुधारणा** - हसन यांनी केलेल्या महत्वाच्या सुधारणात एआय चॅट-बॉट (सायबर बॉट), गुन्हा सीध्द करण्याविषयीच्या कार्यवाहीत विशेष सुधारणा, सेवा (SEVA), इ-समाधान, आरोग्यम् ॲप आणि अशा अनेक सुधारणा फलद्रुप झाल्याने इतरही जिल्ह्यातील पोलीस विभागात त्या अमलात येत आहेत. त्यामुळे भंडारा जिल्हा रोल मॉडेल म्हणून राज्यभर पुढे येत आहे. सुधारणांची संक्षिप्त माहिती वाचकांसाठी पुढे देत आहे.

**एआय चाट-बॉट** - ह्याला सायबर बॉट असेही म्हणतात. ह्याचा लाभ सायबर गुन्हेगारांपासून फसवणूक झालेल्या व्यक्तीला त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी होत आहे. अशा गुन्हेगारांच्या तपासाला गती मिळत आहे. परिणामी अशा गुन्हेगारीला आळा बसत आहे. सोबतच सायबर साक्षरता निर्माण होऊन महिलांच्या सुरक्षेसाठी देखील त्याचा उपयोग होत आहे.

**कन्व्हीक्शन मॉनिटरिंग** - ह्या डिजिटल सुविधेचा उपयोग गुन्ह्यांच्या तपासासाठी आणि गुन्हेगाराला अविलंब अटक करता यावी यासाठी पोलीस आणि तपास अधिकाऱ्यांना होत आहे. गुन्हेगारांची माहिती, पूर्व इतिहास इत्यादी माहिती होऊन त्वरित दोष सिद्धी व्हायला लाभ होत आहे. यात डॅशबोर्डची सोय असल्याने संबंधितांना ही माहिती विनासायास मिळत आहे.

**सेवा** - गुन्हे प्रकरणाचे उत्तम व्यवस्थापन करण्यासाठी तद्वतच गुन्हेगाराचा बळी ठरलेल्या व्यक्तीला देखील पोलिसात सहज तक्रार नोंदविता यावी यासाठी याचा उपयोग होतो.

तपास अधिकाऱ्यांनाही पुढील कारवाई करणे सुलभ होते. याशिवाय कार्यवाहीचा तपशील तक्रारकर्त्याला व्हाट्सॲपवर देण्याची सुविधाही याद्वारे उपलब्ध करण्यात आली आहे.

ई-दरबारद्वारे दर आठवड्याला पोलीस अधीक्षकांव्दारे तक्रारीचे अवलोकन करण्यास आणि तपास अधिकाऱ्यांना योग्य सूचना देण्यासाठी देखील याचा उपयोग होतो. या अंतर्गत होणाऱ्या बैठकीत संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे म्हणणे पोलीस अधीक्षक ऐकूण घेतात आणि कामकाजाची पुढील दिशा ठरवतात. त्यामुळे अधिनस्त अधिकाऱ्यांवर वचक राहून जबाबदारीची जाणीव आणि कार्यक्षमतेत वाढ होते.

**ई-समाधान** - या अंतर्गत ही अधिकारी आणि कर्मचारी आपल्या अडीअडचणी मांडून वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळवू शकतात.

**आरोग्यम् ॲप** - ह्या अप्लिकेशन अंतर्गत पोलीस कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या आरोग्यविषयक तक्रारी नोंदविल्या जातात. त्यांना आवश्यक सल्ला व उपचाराबाबत तज्ज्ञांचे सहाय्य उपलब्ध करून दिल्या जाते.

आरोग्यविषयक तपशिलाचा अभिलेखही ठेवला जातो याशिवायही प्रतिबंधात्मक व्यवस्थापन, बीट माहिती देणारी प्रणाली, जीपीएस आधारित पेट्रोलिंग, माझा रस्ता माझी सुरक्षा इत्यादी अप्लीकेशन ही अमलात आणण्यात आले आहेत.

-------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

## वाचक लिहितात

### हिंदुत्व बळकट करणारा जय

नुकत्याच झालेल्या बिहार विधान सभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि जनता दल युनायटेड प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल प्रणित महाआघाडीला चारी मुंड्या चीत केले.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीप्रमाणे बिहारमध्ये ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीने एकतर्फी विजय मिळवला यात भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला त्यामुळे बिहार मधील विजय भाजप साठी ऐतिहासिक ठरला आहे. महाराष्ट्र आणि बिहार मधील निवडणुकीत महिला आणि युवक यांची टक्केवारी अधिक आहे.

अनेक वर्षे सत्तेत असणाऱ्या काँग्रेसला गेल्या अनेक निवडणुकीत पराभव पत्कारावा लागला आहे. याची प्रामुख्याने दोन-तीन कारणे आहेत एक म्हणजे काँग्रेसचे शीर्ष नेते राहुल गांधी हे अपरिपक्व आहे त्यांच्या नेतृत्वात काँग्रेस १९ निवडणूक हरल्या आहेत. दुसरे कारण म्हणजे प्रत्येक वेळी खोट्या कथानकांचा आधार घेतला गेला. प्रत्येक वेळी हे उपयोगी होत नसते.

२०२४ मधील लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस प्रणित महा आघाडीने भाजप राज्यघटना पालटणार असा खोटा प्रचार केला आणि त्याचा मोठा फटका भाजपला बसला. खोट्या कथानकांमधील सत्यता उघड झाल्यावर महाराष्ट्र आणि बिहारमध्ये निवडणुकीत मत चोरीचे खोटे कथानक पुढे आणले गेले मात्र या फसवणुकीला जनतेने भीक घातली नाही.

तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांनी हिंदुत्वाची ठोस भूमिका घेतल्यामुळे हिंदूंच्या मतांचे विभाजन झाले नाही. एकंदरीतच हिंदुत्व न पचणाऱ्यांना बिहाराच्या मतदार आणि भाजप यांनी घरचा रस्ता दाखवला आहे. खोट्या कथानकांमुळे काँग्रेस प्रणित महाआघाडीने स्वतःची विश्वासार्हतता मात्र गमावली आहे.

हिंदू स्वधर्मावरील आघातांविषयी जागृत होत आहे. त्यामुळे हिंदू द्वेषी पक्षांचे स्वरूप हिंदूंच्या लक्षात येत आहे. पुढच्या वर्षी बंगाल, तामिळनाडू आणि केरळ या राज्यात निवडणुका आहे त्यामुळे भविष्यात भाजपाने हिंदुत्वाची भूमिका अधिक बळकट केल्यास त्यांना अधिक लाभ होईल. येणाऱ्या निवडणुकीत यश मिळवण्यासाठी हिंदुत्वनिष्ठ पक्षांनी हिंदुत्व अधिक बळकट करणे आवश्यक आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.

### निष्ठा, आदर्श, तत्व बासनात गुंडाळले

राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. वर्षानुवर्षे त्या पक्षासाठी काम करणारे, सतरंज्या उचलणारे कार्यकर्ते, पदाधिकारी नगरसेवक, नगराध्यक्ष पदाची तिकीट मिळाले नाही म्हणून पक्षांतर करू लागले आहेत. पक्ष सोडताना आपल्याच पूर्वीच्या पक्षाच्या नेत्यांवर टीकाही करतात. राज्यभरात सर्वत्र हेच चित्र दिसून येत आहे. राजकारणाचे क्षेत्र पूर्णतः सडले की काय? अशी स्थिती आहे. राजकारणात निष्ठा, आदर्श, नितीमत्ता शिल्लकच राहिली नाही. प्रत्येकाला अल्पावधीत नेता व्हायचे आहे. नेता झाले की ठेकेदारी करायची आहे, भ्रष्टाचारातून पैसा कमवायचा आहे. स्व. सुदामकाका देशमुख, स्व. गणपतराव देशमुख, कॉ. रामचंद्र घंगारे, भाई बर्धन यांचा काळ आता राहिला नाही. राजकारणाची पातळी कमालीची घसरल्याचे दिसते.

■ प्रल्हाद भेंडारकर, वर्धा.

# वित्तीय भांडवलशाही : नवे साम्राज्य, नवा गुलाम



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

आजच्या काळात जगावर राज्य करणारे साम्राज्य शस्त्रांनी नाही, तर ह्यपैशानेह्ल चालते. हीच आहे वित्तीय भांडवलशाही जिथे भांडवल, म्हणजे पैसा, बाजार आणि बँकिंग यंत्रणा मिळून सत्तेचे खरे केंद्र बनले आहे.

पूर्वी साम्राज्ये तोफा, तलवारी आणि सैन्याच्या जोरावर उभी राहत. आज ती संगणकाच्या स्क्रीनवर, शेअर बाजाराच्या चढउतारात आणि बँकांच्या निर्णयांत उभी राहतात. एका क्लिकवर अब्जावधी डॉलर एका देशातून दुसऱ्या देशात हलवले जातात आणि त्या हालचालीवर संपूर्ण राष्ट्रांचे भविष्य अवलंबून असते. ही व्यवस्था कामगार, शेतकरी आणि सामान्य जनतेच्या कष्टावर उभी आहे, पण नफा मात्र काही हातात केंद्रित आहे. कॉर्पोरेट्स, गुंतवणूक बँका आणि वित्तीय संस्थांनी जगाचा नकाशाच बदलून टाकला आहे.

आज बहुतेक देशांचा अर्थसंकल्प, विकासनीती आणि सामाजिक धोरणेही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या अटींवर ठरतात. विकासाच्या नावाखाली देश कर्जाच्या ओझ्याखाली जातात आणि त्यांच्या लोकशाहीवर बाजार अधिराज्य गाजवतो.

शेअर बाजारातील घसरण म्हणजे सर्वसामान्य माणसाचे भविष्य धोक्यात. चलनवाढ वाढली की गरिबांचा स्वप्नांचा संसार मोडतो, पण काही गुंतवणूकदार मात्र या अस्थिरतेतूनही नफा कमावतात. हीच तर भांडवलशाहीची निर्दयी गणिती पद्धत आहे.

आज वित्तीय साम्राज्य केवळ बँकांपुरते मर्यादित नाही. डिजिटल पेमेंट्स, क्रिप्टोकरन्सी, फिनटेक कंपन्या आणि ई-कॉमर्स यांनी नवीन आर्थिक गुलामी निर्माण केली आहे. डेटा म्हणजेच नवीन सोनं झालं आहे.

मोठ्या कंपन्या तुमच्या खरेदीच्या सवयी, आवडीनिवडी आणि स्वप्नांचाही व्यापार करतात. ग्राहक आता ग्राहक राहिला नाही तर तो एक डेटा प्रॉडक्ट बनला आहे.

भारतातील आर्थिक सुधारणांनंतर (१९९१ पासून) वित्तीय भांडवलशाहीने आपले पाय खोलवर रोवले. खासगीकरण, परकीय गुंतवणूक आणि कॉर्पोरेट अनुदान यांच्या जोरावर संपत्तीची मोजकी केंद्रे तयार झाली.

एकीकडे शेअर बाजार तेजीत, तर दुसरीकडे शेतकरी आत्महत्या ही विषमता वित्तीय भांडवलशाहीची सर्वात क्रूर ओळख आहे. राजकीय पक्षांनाही निधी देणारे हेच कॉर्पोरेट घराणे. त्यामुळे लोकशाहीचे निर्णय जनतेसाठी नव्हे तर गुंतवणूकदारांसाठी घेतले जातात. माध्यमांपासून धोरणांपर्यंत सर्वत्र पैशाची छाप दिसते. परिणामतः जनतेचे शासन कॉर्पोरेट लोकशाही बनले आहे.

वित्तीय भांडवलशाहीविरोधात संघर्ष म्हणजे फक्त आर्थिक नव्हे तर सांस्कृतिक आणि वैचारिक लढा आहे. स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे, सहकार, शेती, हस्तकला आणि नैतिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, वित्तीय शिक्षण आणि पारदर्शक बँकिंग ही काही प्राथमिक पावले आहेत.

परंतु खरी गरज आहे, मानवकेंद्री अर्थव्यवस्थेची. पैसा साधन राहावा, उद्देश नव्हे. आज जगात सर्वात मोठा धोका अणुबॉम्ब नाही, तर पैशाच्या हातात आलेली सत्ता आहे. वित्तीय भांडवलशाहीने माणसाला ग्राहक बनवले, समाजाला बाजार आणि राष्ट्रांना कंपन्यांचे शेअर बनवले. ही साखळी तोडायची असेल, तर विचार बदलावा लागेल माणूस पैशासाठी नव्हे, पैसा माणसासाठी या तत्त्वाकडे परत जावं लागेल.

■ ■ ■




# घरी बनवा आरोग्यदायी च्यवनप्राश

## हिवाळ्यात शरीर राहील उबदार

हिवाळा सुरू झाला आहे. थंड हवामानामुळे सर्दी आणि फ्लूसारख्या समस्या टाळण्यासाठी शरीराला उबदार ठेवणे अधिक महत्त्वाचे होते. या ऋतूत शरीराला आतून बळकट करण्यासाठी अनेक पदार्थ आहेत, त्यापैकी सर्वात प्रभावी म्हणजे च्यवनप्राश.

हे केवळ एक टॉनिक नाही तर औषधी वनस्पती, मसाले आणि पोषक तत्वांनी समृद्ध असलेले पारंपारिक औषधी मिश्रण आहे. च्यवनप्राश रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि हंगामी आजारांपासून संरक्षण करते.

बाजारात च्यवनप्राशचे अनेक ब्रँड उपलब्ध असले तरी, त्यात बऱ्याचदा प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि साखरेचे प्रमाण जास्त असते. म्हणूनच तुम्ही घरी शुद्ध आणि पौष्टिक च्यवनप्राश तयार केला तर ते केवळ आरोग्यदायीच नाही तर चवीलाही चांगले लागेल.

**१ किलो च्यवनप्राश बनवण्यासाठी लागणारे साहित्य**

आवळा १ किलो, तूप २०० ग्रॅम, २५० ग्रॅम मध, गूळ किंवा साखर ५०० ग्रॅम, मसाल्यांचे मिश्रण (औषधी वनस्पती), पिप्पली ५ ग्रॅम, दालचिनी ५ ग्रॅम, हिरवी वेलची ५ ग्रॅम, तेजपत्त्याची २३ पाने, नागकेसर २ ग्रॅम, ज्येष्ठमध १० ग्रॅम, अश्वगंधा १० ग्रॅम, शतावरी १० ग्रॅम, विदारिकंद १० ग्रॅम, लवंगा २३, काळी मिरी ५ ग्रॅम, ५ ग्रॅम सुंठ, तीळाचे तेल ५ टीस्पून

**बनवण्याची पद्धत**

स्टेप १ : आवळा पेस्ट बनवणे

प्रथम आवळा धुवून घ्या. त्यानंतर एका भांड्यात पाणी घेऊन त्यात आवळा शिजवून घ्या. आवळा थंड झाल्यावर, बिया काढून टाका आणि बारीक पेस्ट बनवा. एका पॅनमध्ये थोडे तूप टाका आणि आवळा पेस्ट मंद आचेवर परतून घ्या. सतत ढवळत राहा जेणेकरून ते तळाशी चिकटणार नाही. जेव्हा रंग गडद होईल आणि तूप वेगळे होऊ लागेल तेव्हा गॅस बंद करा.

स्टेप २ : गूळ/साखर पाक तयार करा

आता एक वेगळे पॅन घ्या आणि त्यात थोडे पाणी गूळ किंवा साखर मिक्स करा. एक-स्ट्रिंग सिरप तयार होईपर्यंत ते गरम करा. आता, हे सिरप आवळ्याच्या पेस्टमध्ये मिक्स करून मिश्रण चांगले मिक्स करा.

स्टेप ३: औषधी वनस्पतींचा वापर

सर्व औषधी वनस्पती एकत्र करा आणि बारीक पूड करा. नंतर तयार बारीक पेस्ट मध्ये 1 चमचा तीळाचे तेल आणि उरलेले तूप मिक्स करून मंद आचेवर सतत ढवळत रहा. मिश्रण घट्ट, सुगंधी आणि चिकट झाल्यावर गॅस बंद करा. मिश्रण पूर्णपणे थंड झाल्यावर त्यात मध मिक्स करून चांगले मिक्स करा आणि काचेच्या बाटलीत भरून ठेवा.

हिवाळ्यात च्यवनप्राश खाणे अत्यंत फायदेशीर आहे. च्यवनप्राश सर्व वयोगटातील लोकं खाऊ शकतात. प्रौढांनी सकाळी रिकाम्या पोटी किंवा दुधासोबत १ ते २ चमचे घ्यावे. मुलांना १/२ चमचा च्यवनप्राश घेऊन दूध किंवा कोमट पाण्यासोबत द्यावे.

घरी बनवलेला च्यवनप्राश पूर्णपणे नैसर्गिक आहे आणि शरीराला असंख्य फायदे देतो. हिवाळ्यात च्यवनप्राश खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, सर्दी, फ्लू आणि संसर्गांपासून संरक्षण होते. ते ऊर्जा आणि चैतन्य देखील वाढवते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### समाज सेवक?

दोन तीन पिढया
सत्ता उपभोगली
तरी भरलं नाही पोट
पक्षानं तिकीट नाकारलं
की घेतला यांनी
घटस्फोट ..

मतदारांनीही आता
विचार करायलाच हवा
परिवर्तना शिवाय भौ
विकास होणार
नाय देवा ..

## मुख्यमंत्र्यांच्या मामेभावांचा
# बिनविरोध विजय

### माजी मंत्री यशोमती ठाकूरांचा भाजपवर हल्लाबोल



■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. २० :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत बिनविरोध निवडींची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. सोलापूर, धुळे, अमरावती या ठिकाणांनंतर आता चिखलदरा नगर पालिकेतील निवडणूकही अशाच बिनविरोध निकालामुळे चर्चेत आली आहे.

चिखलदरा नगरपरिषद प्रभाग क्रमांक १० (ब) मधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती हे थेट विजयी झाल्याने राजकीय वातावरण गरमले आहे. प्रतिस्पर्धी उमेदवाराने माघार घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली. मात्र ही माघार देण्यामागे राजकीय दबाव होता का? यावर आता मोठी चर्चा सुरू झाली आहे.

या निवडीला कारणीभूत घटनांची माहिती पुढे आल्यानंतर विरोधकांनी टीका केली आहे. आमदार रवी राणा यांनी विजयानंतर थेट मुख्यमंत्री फडणवीसांना फोन करून भाऊ, बिनविरोध झालं असे सांगितल्याची क्लिप समोर आली. हा व्हिडिओ सार्वजनिक झाल्यानंतर निवडणूक बिनविरोध करण्यासाठी काही राजकीय नेत्यांनी जाणूनबुजून प्रयत्न केले का? असा प्रश्न विरोधी पक्षांनी उपस्थित केला आहे.

**प्रक्रिया बिनविरोध करण्यासाठी दमदाटी - यशोमती ठाकूर**

काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी भाजप, मुख्यमंत्री फडणवीस आणि आमदार रवी राणा यांच्यावर कडाडून टीका केली आहे. त्यांनी आरोप केला की, भाजप आज राणा दाम्पत्याच्या राजकीय प्रभावाखाली वागत आहे. मुख्यमंत्री या निवडणुकीत थेट हस्तक्षेप करत आहेत आणि विरोधी उमेदवारांना धमक्या किंवा पैशांचे आमिष देऊन माघार घेण्यास भाग पाडत आहेत. राज्यात संविधानाचे उल्लंघन होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यांच्या मते, कलोती यांचा पराभव झाला असता तर मुख्यमंत्री आणि भाजपची प्रतिमा धोक्यात आली असती, म्हणूनच ही संपूर्ण प्रक्रिया बिनविरोध करण्यासाठी दमदाटी करण्यात आली.

**फडणवीस यांनी केले कलोती यांचे अभिनंदन**

या घटनाक्रमानंतर महाराष्ट्रभर बिनविरोध निवडींच्या वाढत्या प्रमाणाबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकशाहीची खरी कसोटी म्हणजे स्पर्धात्मक निवडणूक. परंतु सलग अनेक ठिकाणी उमेदवार माघार घेत असल्याने मतदारांना पसंतीचा पर्याय मिळत नाही, ही तक्रार अधिक तीव्र होत आहे. चिखलदरा येथील प्रकरणात उमेदवार बिनविरोध ठरल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी फोनवरून कलोती यांचे अभिनंदन केले.

**निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह**

चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीत आल्हाद कलोती यांनी या वर्षी पहिल्यांदाच उमेदवारी अर्ज दाखल केला होता. फडणवीस यांचे चुलत मामेभाऊ असल्याने त्यांची उमेदवारी सुरुवातीपासूनच चर्चेत होती.

स्थानिक पातळीवरील काही नेत्यांनी त्यांना जिंकवून देण्यासाठी प्रयत्न केले असल्याचे बोलले जात आहे. आमदार रवी राणा यांनी यात विशेष रस घेतल्याची माहितीही समोर येते.

अखेरीस प्रभागातील प्रतिस्पर्धी उमेदवाराने अचानक माघार घेतल्याने कलोती विजयी ठरले. उमेदवार माघार का घेतो? त्यामागे फक्त निर्णय की काही दडपण? असे प्रश्न उपस्थित केले जात आहे. या संपूर्ण घटनेमुळे पारदर्शक निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्हे निर्माण झाल्याची भावना निर्माण झाली आहे. मात्र विरोधकांनी आरोपांमुळे ही राजकीय वातावरण गरम झाले आहे.

# काँग्रेसमध्ये भूकंप, केदारांवर गंभीर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधुम सुरू असतानाच नागपूर काँग्रेसमध्ये असंतोष उसळला आहे.

नागपूरमधील बुटीबोरी आणि इतर काही भागांमध्ये काँग्रेसचा प्रभाव कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा अंतर्गत संघर्ष अधिकच तीव्र होत आहे. माजी मंत्री सुनील केदार यांच्यावर पक्षविघातक वर्तनाचे गंभीर आरोप करण्यात येत असून, या घडामोडींमुळे काँग्रेसच्या स्थानिक संघटनेत मोठे राजकीय तरंग उमटले आहेत.

काँग्रेसचे माजी महासचिव मुजीब पठान यांनी पक्षनेते राहुल गांधी आणि अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पाठवलेल्या पत्रामुळेच या प्रकरणाची सुरुवात झाली. या पत्रात त्यांनी सुनील केदार यांनी बुटीबोरीतील काँग्रेस पक्षाला मागे टाकण्यासाठी भाजपशी हातमिळवणी केल्याचे आरोप केलेत.

पठान यांनी असा दावा केला की, बुटीबोरी नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान केदार यांनी फारशी जवळीक असलेल्या व्यक्तीला काँग्रेसकडून उमेदवारी दिली. शिवाय, नगराध्यक्ष पदासाठी चार काँग्रेसदावेदार असल्यावरही एकालाही अधिकृत एबी फॉर्म न देण्याचा निर्णय घेतल्याने बुटीबोरीत पंजा चिन्हच गायब झाल्याचे दृश्य निर्माण झाले.



यामुळे स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी असून, त्यांनी थेट हायकमांडकडे केदार यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे.

सुनील केदार यांच्यावरील आरोपांची मालिका इथेच थांबत नाही. काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाबा अष्टेकर यांनी तर त्यांच्यावर आणखी गंभीर आरोप केले आहेत.

अष्टेकर यांच्या मते एका बँक घोटाळा प्रकरणात १२०० कोटींची वसुली प्रलंबित असून, त्याच पार्श्वभूमीवर केदार यांनी भाजपसाठी अनुकूल वातावरण तयार करण्याचे काम केले. तसेच काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी न देता बाहेरून आयात केलेल्या व्यक्तींना उमेदवारी देण्यात आली. यातील काही उमेदवार पूर्वी भाजपमध्ये कार्यरत होते, असा आरोपही करण्यात आला आहे.

डिगडोह आणि बुटीबोरी या दोन्ही ठिकाणी काँग्रेसने स्वतःचे उमेदवार न देता अप्रत्यक्षपणे भाजपच्या माजी कार्यकर्त्यांना पाठिंबा दिल्याचा आरोप स्थानिक नेत्यांनी केला आहे.

या अंतर्गत कलहामुळे काँग्रेसमधील अनेक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. कामठीचे माजी नगराध्यक्ष अन्सारी यांनी तर थेट काँग्रेसचा राजीनामा देत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. पक्षातील जुन्यांना डावलून बाहेरच्यांना संधी देण्याच्या निर्णयामुळे स्थानिक पातळीवर काँग्रेसला मोठा फटका बसत असल्याचे मत निष्ठावंत कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर आता अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुनील केदार यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. जर कारवाई झाली नाही तर आम्ही थेट दिल्लीला जाऊन आंदोलन करू, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे नागपूर जिल्ह्यातील काँग्रेसची अंतर्गत फुट समोर आली आहे.

नागपूर काँग्रेसमधील ही संघर्षस्थिती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. निवडणुकीच्या तोंडावरच पक्षात निर्माण झालेला असंतोष आणि आरोपप्रत्यारोपांचा कल्लोळ यामुळे काँग्रेसची संघटनात्मक क्षमता कमजोर होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

बुटीबोरी नगर परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसची अधिकृत निवडणूकच कोसळल्यासारखे चित्र दिसत असून, हे प्रकरण हायकमांडच्या दृष्टीने गंभीर मानले जात आहे. पक्षाने या प्रकरणात हस्तक्षेप करून कारवाई केली नाही, तर आगामी निवडणुकांत काँग्रेसला मोठा तोटा सहन करावा लागू शकतो, असा इशारा स्थानिक नेत्यांनी दिला आहे. पुढील काही दिवसांत दिल्लीकडून काय निर्णय येतो याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सलील देशमुखांचा शप राष्ट्रवादीला रामराम

### नागपुरच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठा राजकीय भूकंप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :** नागपूरमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीत मोठा भूकंप झाला आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा राजीनामा पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे.



सलील देशमुख यांच्याकडे पक्ष संघटनेत कोणतेही प्रमुख पद नव्हते, मात्र त्यांनी सहा महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत काटोल मतदारसंघातून उमेदवारी घेतली होती. ही लढत अत्यंत प्रतिष्ठेची ठरली होती, पण त्यात त्यांचा पराभव झाला.

आज पत्रकार परिषदेत बोलताना सलील देशमुख यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा देत असल्याचे स्पष्ट केले. मात्र त्यांच्या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे पक्षाच्या नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकांतील गणितांवर परिणाम होण्याची शक्यता राजकीय तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

आता पक्ष त्यांची मनधरणी करतो का, किंवा काही महत्त्वाची जबाबदारी देऊन त्यांना पुन्हा पक्षात आणण्याचा प्रयत्न करतो का? याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पत्रकार परिषदेत सलील देशमुख यांनी प्रकृतीच्या कारणावरून पक्ष सोडत असल्याचे सांगितले असले तरी, पक्षातील घुसमट हे कारण असल्याचे तसेच ते अन्य पक्षात जाणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# राजेंद्र मुठे समिती स्थापनच केली नव्हती!

**पार्थ पवार भूखंड घोटाळ्यात मंत्री बावनकुळे यांचे विधान**



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २० :** पुण्यातील मुंढवा भूखंड घोटाळ्याच्या चौकशीसाठी राजेंद्र मुठे समिती कधीच स्थापन केली नव्हती, असा दावा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

या समितीने परवाच आपला अहवाल सादर केला आहे. त्यानंतर बावनकुळे यांनी हे विधान करून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. त्यांच्या या विधानाची राज्याच्या राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पुण्यातील मुंढवा भूखंड घोटाळ्याप्रकरणी अडचणीत सापडलेत. सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी राजेंद्र मुठे समिती स्थापन केली होती. या समितीने गत मंगळवारी आपला अहवाल सादर केला. माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांच्या मते, या समितीने पार्थ पवार यांना क्लीन चिट देऊन केवळ या प्रकरणातील इतर आरोपी दिग्विजय पाटील व शीतल तेजवानी यांच्या डोक्यावर खापर फोडले आहे. या प्रकरणी राजकीय आरोप प्रत्यारोप रंगले असताना आता बावनकुळे यांनी सरकारने राजेंद्र मुठे समिती स्थापनच केली नसल्याचा दावा केला आहे. एबीपी माझाने हे वृत्त दिले आहे.

या वृत्तानुसार, चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राजेंद्र मुठे नामक समिती कधीच स्थापन केली नव्हती. त्यामुळे त्यांचा अहवाल काय आहे हे मला माहिती नाही. प्रस्तुत घोटाळा उजेडात आला तेव्हा जमाबंदी आयुक्तांनी समिती स्थापन केली. प्राथमिकदृष्ट्या जे या घोटाळ्यात गुंतलेले दिसून आले त्यांच्यावर स्थानिक पातळीवरील समितीच्या अहवालानुसार योग्य ती कारवाई करम्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने विकास खारगे यांच्या नेतृत्वात उच्चस्तरीय समिती स्थापन केली. त्या समितीचा अहवाल या प्रकरणी महत्त्वाचा राहणार आहे. खारगे समितीचा अहवाल आल्यानंतर कुणावर करायची? याचा निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

# मुखी झाली पाच बछड्यांची आई

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २० :** मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात भारतात जन्मलेल्या चित्ता मुखीने पाच बछड्यांना जन्म दिला आहे. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी गुरुवारी ही माहिती प्रसार माध्यमांना दिली.

मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात भारतात जन्मलेल्या चित्ता ह्यमुखीह्नने पाच बछड्यांना जन्म दिल्याने एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. आई आणि शावक चांगले काम करत आहेत, असे यादव यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

भारताच्या चित्ता पुनर्प्रजनन उपक्रमासाठी ही एक अभूतपूर्व प्रगती आहे, असे ते म्हणाले. नामिबियातून



मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात आणलेल्या ह्यज्वालाह्ल या मादी चित्त्याच्या पोटी २९ मार्च २०२३ ला चार बछड्यांचा जन्म झाला होता. त्यातील तिघांचा मृत्यू झाला तर मुखी ही त्यातील एकमेव जगणारी मादी चित्ता होती.

आयुष्याच्या पहिल्या टप्प्यात गंभीर जखम आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून तिने प्रौढावस्थेत प्रवेश केला होता. आता तिच्या या यशस्वी प्रसूतीमुळे भारतातील चित्त्यांच्या नैसर्गिक पुनर्वसन प्रक्रियेला महत्त्वाची चालना मिळाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

३३ महिन्यांची पहिली भारतात जन्मलेली मादी चित्ता मुखी आता प्रजनन करणारी पहिली भारतीय चित्ता बनली आहे. यामुळे ह्यप्रोजेक्ट चित्तासाठी ही एक महत्त्वाची कामगिरी ठरली आहे, असे यादव म्हणाले.

# महायुतीत टोळीयुद्ध

### सपकाळ यांचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २० :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वक्तव्य केले.

सपकाळ म्हणाले, हे सत्तेसाठी एकत्रित आले आहे, यांचे विचार एक नाही, त्यामुळे यांच्यात टोळी युद्ध अनेक दिवसांपासून सुरू आहे. शिंदे यांनी दिल्लीश्वरांना गाठले. मूळ मुख्यमंत्री अमित शहा आहे. सर्व कारभार अमित शहा चालवतात. ज्यांना ते सांगतात तेच मंत्री होतात. म्हणून छोट्या छोट्या तक्रारी सुद्धा त्यांच्या कानात घालाव्या लागतात. हे सरकार महाराष्ट्राचे स्वाभिमान गहाण ठेवून दिल्लीतून निर्णय करू लागली आहे.

काँग्रेसमधील अंतर्गत वादावर बोलताना यासंदर्भात माध्यमातून मलाही त्या प्रकारची माहिती मिळाली आहे. मात्र अद्याप पर्यंत कोणतीही तक्रार किंवा राजीनामे मला मिळालेले नाही.. काँग्रेस आपल्या भूमिकेवर ठाम आहे, असे ते म्हणाले.

# नागपूर हिवाळी अधिवेशनात कोळी जमातीचा भव्य मोर्चा

### पूर्वतयारीसाठी मोर्चेबांधणी : जात व वैधता प्रमाणपत्र अडचणी विरोधात जमात बांधव एकवटला

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २० :** आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रणित आदिवासी कोळी महादेव, डोंगर कोळी, कोळी मल्हार, टोकरे कोळी, कोळी ढोर जमातीच्या संघर्ष समितीने जात व वैधता प्रमाणपत्रांसाठी होत असलेल्या भेदभावाविरोधात येत्या नागपूर हिवाळी अधिवेशन दरम्यान विधानभवनावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती संघर्ष समितीचे प्रमुख आयोजक दत्ता सुरवसे यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर मुंबई, कोकण विभाग, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, पाठोपाठ बेरार विभागात पूर्वतयारी बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. २१ नोव्हेंबर रोजी चिखली, भानखेड व बुलढाणा येथे, २२ नोव्हेंबर वाशिम जिल्हा, २३ नोव्हेंबर अकोला, तसेच चौहट्टा बाजार, दर्यापूर, सामदा तसेच २४ नोव्हेंबर रोजी अमरावती व २५ नोव्हेंबर रोजी यवतमाळ येथे कोळी जमात बांधवांच्या विभागीय बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

बेरार विभागाच्या बैठकीत अकोलाचे प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. महेंद्र काळे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. शिवदास बूटे, राम भांडे पाटील, गणेश इंगळे, शिवा महाराज भांडे, वडाळ, बुंदे, अरविंद घावट, उमेश पाटील, अनंत कुटेमाटे, गजानन पेटे, प्रसिद्ध उद्योजक रघुनाथ इंगळे, मानकरी, भगवान महाराज, दीपक वाघ, यांच्यासह राज्यभर दौऱ्यात सहभागी मनोहर कोळी, महादेव व्यंकाळी, बाळासाहेब बळवंतराव, एम टी कोळी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.




समितीतर्फे नुकताच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या कार्यालयावर भव्य पदयात्रा मोर्चा आणि दिवसभर धरणे आंदोलन केले होते. त्यानंतर सरकार दरबारी आपली व्यथा मांडण्यासाठी नागपूर अधिवेशन दरम्यान हा मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चात लाखोच्या संख्येने कोळी जमात बांधव सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संघर्ष समितीचे प्रमुख दत्ता सुरवसे यांनी सांगितले की, विस्तारित क्षेत्रातील ६३ लाख कोळी बांधवांवर वर्षानुवर्षे अन्याय होत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी विकास योजनेतील क्षेत्रातील लोकांसाठी वेगळा न्याय, तर विस्तारित क्षेत्रातील बांधवांना वेगळा न्याय, हे संविधानाने दिलेल्या मानवी हक्क आणि मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे.

टीएसपी क्षेत्रातील लोकांना रक्तनात्याच्या आधारावर प्रमाणपत्रे दिली जातात, कोणतीही कागदपत्रे तपासली जात नाहीत, दक्षता पथकाकडे प्रकरणे पाठवली जात नाहीत, आणि आठवड्याभरात वैधता प्रमाणपत्रे मिळतात.

त्यांनी पुढे सांगितले, याच्या अगदी उलट, विस्तारित क्षेत्रातील आमच्या जमातींना हेच प्रमाणपत्र मिळवताना अनेक वर्षे त्रास दिला जातो. आमच्या ६३ लाख बांधवांची प्रकरणे १५-१५ वर्षांहून अधिक काळ प्रलंबित ठेवली जातात आणि केवळ त्रुटी काढून ती 'बोगस' ठरवली जातात. आम्हाला बोगस ठरवणाऱ्या अधिकाऱ्यांनी आमच्या समाजाच्या इतिहासाची आणि त्यांच्याकडील संशोधनाची श्वेतपत्रिका जनतेसमोर मांडावी, अन्यथा ही लढाई आता रस्त्यावर लढली जाईल. आगामी नागपूर हिवाळी अधिवेशनात भव्यार मोर्चा काढण्याबरोबरच ५०० कार्यकर्ते आमरण उपोषण करतील, अशी माहिती त्यांनी दिली.


मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन

अॅग्रो व्हिजन

कार्यशाळा, राष्ट्रीय कृषि प्रदर्शन व परिसंवाद

२१-२४ नोव्हेंबर, २०२५

आज भव्य उद्घाटन

वेळ : सकाळी १०.३० वा.

रा.तु.म. नागपूर विद्यापिठ ग्राऊंड, अमरावती रोड, नागपूर

शेतकऱ्यांचे शिक्षण, प्रोत्साहन आणि संक्षमीकरणाचे उद्दिष्ट समोर ठेवून गेली १५ वर्षे अॅग्रोव्हिजनची वाटचाल सुरू आहे. ज्ञानवर्धक कार्यशाळा, आधुनिक कृषी तंत्रज्ञान दाखवणारे भव्य राष्ट्रीय कृषी प्रदर्शन आणि कृषी व्यवसायाला चालना देणाऱ्या परिषदा यांना शेतकरी बांधवांनी भरभरून प्रतिसाद दिला. कृषी संबंधित प्रत्येकाने बघायलाच हवे असे हे १६ वे अॅग्रोव्हिजन.



कार्यक्रमाचे अध्यक्ष: मा.ना.श्री. नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग, भारत सरकार, मुख्य प्रवर्तक, अॅग्रोव्हिजन


उद्घाटक: मा.ना.श्री. शिवराज सिंह चौहान, केंद्रीय मंत्री कृषी व शेतकरी कल्याण भारत सरकार

प्रमुख अतिथी: मा.ना.श्री. दत्तात्रय भरणे, कृषी मंत्री, महाराष्ट्र

प्रमुख अतिथी: मा.ना.श्री. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री, कृषी, महाराष्ट्र; मा.ना.डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री, सहकार, महाराष्ट्र

प्रमुख उपस्थिती: डॉ. मिनेश शाह, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक एन.डी.डी.बी; श्री. विक्रम श्रॉफ, उपाध्यक्ष व सह मुख्य कार्यकारी अधिकारी, युपीएल; श्री. अनिल बावेजा, मिशन डायरेक्टर समर्थ; श्री. विजय राम नाकरा, अध्यक्ष, फार्म इक्वीपमेंट बिझनेस, महिंद्रा अँड महिंद्रा ली

विनीत



मा. डॉ. सी.डी. मायी, अध्यक्ष, सल्लागार समिती, अॅग्रोव्हिजन; गिरीश गांधी, संयोजक; रवि बोरटकर, आयोजन सचिव; रमेश मानकर, आयोजन सचिव

**अॅग्रोव्हिजन २०२५ राष्ट्रीय कृषी प्रदर्शनाची वैशिष्ट्ये**

- ५०० पेक्षा जास्त संस्थांचा सहभाग
- नवी उत्पादने व तंत्रज्ञान बघण्याची संधी
- विशेष दालन : MSME व अॅग्री स्टार्टअप

राष्ट्रीय कृषी प्रदर्शन: २१ ते २४ नोव्हेंबर २०२५, वेळ : स. ११.०० ते सायं ६.०० पर्यंत

शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा: २२ ते २४ नोव्हेंबर २०२५, वेळ : स. १२.०० ते सायं ५.०० पर्यंत

कार्यशाळांच्या अद्यावत माहिती साठी QR code स्कॅन करा

अॅग्रोव्हिजन सल्लागार समिती सदस्य: डॉ. मिनेश शाह, डॉ. शरद गडाख, डॉ. नितीन व्ही. पाटील, डॉ. इंद्रमणी मिश्रा, डॉ. दिलीप घोष, डॉ. व्ही.एन. वाघमारे, डॉ. एन.जी. पाटील, डॉ. एस.के. शुक्ला, श्री. एम.जी. शेंबेकर, कॅ. डॉ. एल.बी. कलंत्री, श्रीमती रिना सिन्हा

अॅग्रोव्हिजन फाउंडेशन सदस्य: श्री. शिरीष भगत, श्री. सुधीर दिवे, श्री. आनंदराव राउत, श्री. मिलींद टिचकुले, श्री. प्रशांत कुकडे, श्री. विजय जाधव, श्री. श्रीधर ठाकरे, श्री. प्रशांत वासाडे, डॉ. पिनाक दंदे, डॉ. सुनिल सहातपुरे, डॉ. के.डी. ठाकुर, श्री. माधव कोटस्थाने, श्री. नितीन कुळकर्णी, डॉ. हितेंद्र सिंग

विशेष कार्यशाळा २१ नोव्हेंबर २०२५

दुग्ध व्यवसाय चारा व्यवस्थापन नविन तंत्रज्ञान आणि प्रक्रिया उद्योग वेळ : दु. १२.३०

राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रः मधमाशी पालन वेळ : दु. २.००

*या सोहळ्याला आपण अवश्य उपस्थित रहावे ही आग्रहाची विनंती*

आयोजक: AGROVISION FOUNDATION, MM ACTIV Sci-Tech Communications, MEDC, VED

सहयोग: MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES, nsai, CropLife, TMA, FAI